# माणूस

शनिवार । ५ ऑगस्ट १९७८
७५ पैसे

स. न. वि. वि.

जनमत कौल घेण्याचा आपला उपक्रम अत्यंत स्तुत्य व अभिनंदनीय आहे.
कृपया एक प्रश्नपत्रिका मला त्वरित पाठवून द्यावी.
आपल्या या अभिनव योजनेत मी भाग घेऊ इच्छितो.

आर. व्ही. टिळक
M. A., S. T. C.
राजवाडा, प्लॉट १/८, सांगली.

सुटया प्रश्नपत्रिका मागविण्यापेक्षा शक्यतो अंकात छापलेली प्रश्नपत्रिकाच भरून अंकातून वेगळी काढून पाठवावी. मागील अंकात छापलेली पत्रिका मिळाली नसल्यास किंवा अन्य कुणी ती भरून पाठविली असल्यास या अंकात शेवटी पुन्हा छापलेल्या प्रश्नपत्रिकेचा उपयोग करावा.

## जनमतकौल उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे....

# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक दहावा

५ ऑगस्ट १९७८

मूल्य ७५ पैसे



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४४३४५९

□


# माहितगार आणि सवाईमाहितगार

□ दि. २९ जुलैच्या अंकातील 'महाराष्ट्रातील सत्तान्तर : अगोदर आणि नंतर' हा माहितगारांचा लेख वाचला.

'जनता पक्षातील पूर्वाश्रमीच्या जनसंघाने व त्याचे नेते उत्तमराव पाटील यांनी मीच मुख्यमंत्री होणार हा हट्ट धरला नसता तर चार महिन्यांपूर्वीच जनता पक्षाचा मुख्यमंत्री असलेले केवळ जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले असते.' ही 'माहितगारां'ची या लेखातील माहिती आणि त्यांचा निष्कर्ष दोन्हीही निखालस चूक आहेत. या निमित्ताने चार महिन्यांपूर्वीच्या घटनांची आणि त्यामागील सूत्रांची उजळणी करणे आवश्यक आहे.

निवडणुकीनंतर महाराष्ट्रात कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही. जनता पक्ष सर्वांत मोठा पक्ष म्हणून निवडून आला होता, ही राजकीय स्थिती दि. २८ फेब्रुवारीलाच स्पष्ट झाली होती.

दि. १ मार्चलाच जनता पक्षाने आपला नेता निवडून, त्याच दिवशी राज्यपालांची भेट घेऊन 'सर्वांत मोठा पक्ष' म्हणून आम्हाला सरकार बनविण्याची अनुमती द्या अशी मागणी करावयास हवी होती. तसे जनता पक्ष करू शकला असता तर जनता पक्ष सरकार स्थापणार आहे हा विश्वास सर्वत्र निर्माण होऊन अनेक अपक्षांनाही जनता आघाडीत सामील करून घेऊन स्थिर बहुमताकडे वाटचाल करता आली असती.

परंतु असे घडले नाही.

लोकशाही पद्धतीनुसार आमदारांनी आपला नेता निवडला असता तर उत्तमराव पाटलांची निवड झाली असती. (आणि पुढे तसे घडलेही.)

जनसंघद्वेषाची कावीळ झालेल्यांना पूर्वाश्रमीचा जनसंघवाला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर कसा बघवणार? त्यातून कुटिल कारवायांना आरंभ झाला.

केन्द्रातील काही पूर्वाश्रमीच्या काँग्रेसी नेत्यांनी वसंतदादा पाटील मुख्यमंत्री व्हावे आणि जनता पक्षाने त्यांना पाठिंबा द्यावा असा पवित्रा घेतला.

विशिष्ट केन्द्रीय नेत्यांच्या या पवित्र्यास पूर्वाश्रमीच्या जनसंघवाल्यांनी (आणि समाजवाद्यांनीही) प्रखर विरोध केला.

त्यामुळे 'महाराष्ट्रात सत्ताबदल घडवून आणण्याचा प्रयत्न दिल्लीत यशवंतराव चव्हाण व मधु लिमये करीत होते तेव्हा आपल्याला मुख्यमंत्रिपद मिळत नाही म्हणून वसंतदादा पाटील यांनाच 'जनता'चा पाठिंबा देऊन दिल्लीत चाललेले प्रयत्न उधळून लावण्याचा प्रयत्न उत्तमराव पाटील यांनी करून पाहिले. मात्र या प्रयत्नांना यश आले नाही,' हे माहितगारांचे विधान केवळ खोटे नसून खोड-

साळपणाचे आहे, उत्तमरावांवर अन्याय करणारे आहे. किंबहुना त्या वेळी आणि त्यानंतरही वसंतदादा सरकार पाडण्यासाठी उत्तमराव पाटलांनी जेवढी खटपट केली तेवढी कोणीही केली नाही.

पूर्वाश्रमीच्या समाजवाद्यांना उत्तमराव पाटलांऐवजी बापूसाहेब काळदाते मुख्यमंत्री झाले असते तर हवे होते; परंतु संसदीय मंडळाच्या निर्णयानुसार खासदारांना निवडणुकीस उभे राहता येत नव्हते. (आणि बापूसाहेब काळदाते उभे राहिले असते तरीही उत्तमराव पाटीलच निवडून आले असते हा भाग निराळा.) त्यामुळे त्यांनी हा प्रश्न केंद्रीय संसदीय मंडळाकडे घेऊन जाण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

बापूसाहेब काळदाते यांची निवड 'अपरिहार्य' आहे अशी हवा निर्माण करण्यासाठी समाजवाद्यांनी त्यांच्या पत्रकार मित्रांच्या मदतीने अशी बातमी प्रसारित केली, की जनता पक्षाने बापूसाहेब काळदाते यांची निवड केली तर शरद पवारांच्या नेतृत्वाखालील काहीजण जनता मंत्रिमंडळास पाठिंबा देतील.

माहितगारांचीही 'समजूत' अशीच असावी. कारण जनसंघ व उत्तमराव पाटील यांनी हट्ट धरला नसता तर चार महिन्यांपूर्वीच जनता पक्षाचा मुख्यमंत्री झाला असता असे विधान त्यांनी सदर लेखात केलेले आहे.

या 'हवे'ची नीट शहानिशा करून घेतली पाहिजे. मुळात शरदराव पवार हे बापूसाहेब काळदाते यांना पाठिंबा देण्यासाठी त्या वेळी कॉंग्रेसच्या बाहेर पडण्यासाठी तयार होते ही केवळ एक 'हवा'च होती.

खुद्द शरदराव पवार यांनाच त्या वेळी जनता पक्षाने मुख्यमंत्रिपद देऊ केले होते. हा निरोप जनता पक्षातर्फे खुद्द नानाजी देशमुख यांनीच दिला होता. इतकेच नव्हे तर खुद्द बापूसाहेब काळदाते आणि उद्धवराव पाटील यांनी प्रत्यक्ष भेटून शरदराव पवार यांना याबाबतीत आग्रह धरला होता. दिल्लीतही अटलबिहारी वाजपेयी यांनी यशवंतराव चव्हाणांची मुद्दाम भेट घेऊन याबाबतीत गळ घातली होती.

परंतु त्या वेळी शरदराव पवार आणि यशवंतराव चव्हाण यांनी या साऱ्या आग्रहाला नकार दिला होता. कारण त्या वेळी त्यांच्या राजकारणाच्या दृष्टीने ते सोयीचे नव्हते.

आज शरदराव पवार बाहेर आले आहेत. कारण त्यांच्या दृष्टीने ही वेळ सोयीची आहे एवढेच.

शरदराव पवार यांना मुख्यमंत्री करावयास जनता पक्ष तयार असूनही, जे शरदराव कॉंग्रेसच्या बाहेर त्या वेळी पडण्यास तयार नव्हते ते, बापूसाहेब काळदाते मुख्यमंत्री झाले असते तर त्या वेळी बाहेर पडले असते असे म्हणणे हे केवळ स्वप्नाळूपणाचे आहे, एवढेच.

त्यामुळे उत्तमराव पाटील हे नेते झाल्यामुळे जनता पक्षाचे मंत्रिमंडळ 'लांबले' हे विधान केवळ जनसंघद्वेषातून निर्माण केलेल्या 'हवे'तून आले आहे. त्याला सत्याचा कवडीइतकाही अधिकार नाही.

'राजकारण करणे हे कवायती करण्याइतके सोपे नसते' हे माहितगारांचे म्हणणे अगदी खरेच आहे; पण माहिती नसताना बिनबुडाची विधाने करणे हे कवायती करण्याहूनही फार सोपे आहे हे 'माहितगार' म्हणणाऱ्यांनी तरी अवश्य ध्यानात ठेवावे. कवायतींना निदान 'कष्ट' तरी करावे लागतात.

'शे. का. प.'बद्दलची माहितगारांची माहिती व विश्लेषण असेच चुकीचे आहे. थोड्या तपशिलाने हा विषय पाहू —

शेकापची वास्तविक ताकद लक्षात घेऊन त्यांना सुमारे ४० जागा द्याव्यात असे बहुसंख्य कार्यकर्त्यांचे मत होते, तर महाराष्ट्रात जनता व मित्र पक्षांचे सरकार आणण्यासाठी शेकापला सुमारे ८० जागा द्याव्यात असे काही कार्यकर्त्यांचे मत होते.

'अशा जागांचा समझोता' जनता पक्षाने मान्य केला असता तर—'

शेकापने जनता पक्षामुळे गमावलेल्या ५ जागा आणि ऐक्याच्या वातावरणात, आज सुमारे ५००० मतांनी गमविलेल्या १० जागा, अशा एकूण १५ जागा शेकापला जास्त मिळाल्या असत्या.

जनता पक्षाने शेकापमुळे गमविलेल्या ४ जागा आणि ऐक्याच्या वातावरणात मिळू शकली असती अशी १ जागा, अशा एकूण ५ जागा जनता पक्षाला जास्त मिळाल्या असत्या.

अर्थात समझोता तुटल्यामुळे जनता पक्षाला मिळालेल्या ९ जागा जनता पक्षाला गमवाव्या लागल्या असत्या, हेही इथे विसरता येणार नाही.

ढोबळ मानाने असे म्हणता येईल की जनता पक्षाच्या काही जागा कमी झाल्या असत्या तर शेकापच्या सुमारे डझनभर जागा वाढल्या असत्या. परंतु —

'अशी जागा समझोत्यामुळे प्रांतभर ज्या प्रचंड-बंडखोरीचा उद्रेक झाला असता आणि रागावलेल्या व रुसलेल्या, जनता पक्ष कार्यकर्त्यांनी शेकापशी जो असहकार पुकारला असता याचा विचार केला तर जनता पक्ष आणि शेकापचीही आज आहे, त्यापेक्षाही वाईट स्थिती झाली असती असे वाटते.

कारणमीमांसा अशी—

१. शहापूर २. जलंब ३. कंधार ४. अहमदपूर ५. तुळजापूर ६. सांगोला ७. कऱ्हाड (उत्तर) ८. अलिबाग ९. पनवेल १०. जिंतूर ११. मंगरूळपीर १२. गंगाखेड १३. कळंब. हे शेकापचे विजयी मतदारसंघ.

यांपैकी पहिले सात मतदारसंघ जनता व मित्रपक्षांनी शेकापसाठी एकतर्फी सोडून दिलेले होते. नंतरच्या तीन मतदारसंघात जनता पक्षाचे उमेदवार उभे होते, तर शेवटच्या तीन मतदारसंघात मित्रपक्षांनी (अनुक्रमे कारिप, खोरिप) उमेदवार उभे केले होते.

## जनता पक्षामुळे पराभूत मतदारसंघ

१. पेण २. खालापूर ३. शिंगणापूर ४. पाथरी ५. उस्मानाबाद ६. उदगीर. या मतदारसंघात शेकापने जनता पक्षापेक्षा अधिक मते मिळविली असून दोघांची बेरीज विजयी उमेदवारांपेक्षा अधिक होते. येथे जनता पक्षाने आपला उमेदवार उभा केला नसता तर शेकापला विजय मिळाला असता.

यातील उदगीर हा मतदारसंघ शेकापने जनतासाठी मूळ समझोत्यामध्ये सोडला होता. साऱ्या महाराष्ट्रात याच एका मतदारसंघात शेकापला अनपेक्षितरीत्या जनता पक्षापेक्षा दोन हजार

मतांचा पुढावा मिळाला; परंतु येथील शेकापचा उमेदवार व त्याचे सर्व समर्थक हे जनता पक्षाने उमेदवारी न दिल्यामुळे रुसून शेकापत गेले होते हे लक्षात घेतले की यातील रहस्य स्पष्ट होते.

## तर जिंकले असते असे मतदारसंघ

शेकापने हटवादी भूमिका न घेता योग्य जागांवर समाधान मानून प्रांतभर ऐक्याचे वातावरण निर्माण केले असते तर शेकापला पुढील जागा कदाचित जिंकता आल्या असत्या. या जागा शेकापने साधारणपणे पाच हजारांपेक्षा कमी मतांनी गमविल्या आहेत.

१. परभणी २. चौसाळा ३. निलंगा ४. मोहोळ ५. माढा ६. शिरोळ ७. कोल्हापूर ८. भिलवडवांगी ९. सिंदखेडराजा. यातील पहिल्या पाच जागा जनता पक्षाने शेवटपर्यंत शेकापला एकतर्फी सोडल्या होत्या. कोल्हापूर ही जागा तर जनता पक्षानेच जिंकली. सिंदखेडराजा येथे इंदिरा कॉंग्रेस (२७६३२) विजयी झाली तर शेकापला (२०११२) दुसरा क्रमांक प्राप्त झाला. अर्थात येथे जनताच्या दोन बंडखोरांची (२४१५१) व अधिकृत उमेदवारांची (२८५७) मते ही शेकापपेक्षा जास्त (६८९६) असून विजयी उमेदवारापेक्षा फक्त ६२४ मतांनी कमी आहेत.

## ...तरीही हारले असते असे मतदार संघ

लोकमताचा आजचा कौल लक्षात घेता, पुढील मतदारसंघात विजय मिळणे– कोणत्याही परिस्थितीत शक्य नव्हते असे दिसते. कारण येथे शेकापचे उमेदवार साधारणपणे दहा हजारांपेक्षा अधिक मतांनी पराभूत झालेले आहेत.

१. बोरगाव मंजू (२५०००) २. कारंजा (२५०००) ३ मुरबाड (१७०००) ४. कराड (द.) (२६०००) ५. मंगरूळ (१००००) ६. खानापूर–आटपाडी (१८०००). येथे कंसातील आकडे हे विजयी उमेदवार व शेकाप उमेदवार यांच्यातील मतांचा फरक दाखवितात. यातील पहिल्या पाच जागा शेकापला एकतर्फी सोडल्या होत्या तर शेवटच्या जागेवर शेकाप जनतापक्षाच्या पुढे असून (४००० मतांनी) दोघांची एकत्रित मते मात्र कॉंग्रेसपेक्षा कमी (८००० मतांनी) आहेत.

## अनामत रक्कम गमविली असे मतदारसंघ

शेकापने लढविलेल्या जागांपैकी ४९ जागांवर शेकाप अनामत रक्कमसुद्धा वाचवू शकला नाही. अशा मतदारसंघातील शेकाप आणि जनता पक्ष व मित्रपक्ष यांच्या तुलनात्मक सामर्थ्याचा अभ्यास पुढील कोष्टकावरून करता येईल.

| अ. क्र. | मतदारसंघ | शेकाप | जनता पक्ष व मित्रपक्ष |
|---|---|---|---|
| १. | मालवण | ८२८४ | ३५२२१ |
| २. | अंबरनाथ | ५५७१ | ३३०८७ |
| ३. | कल्याण | १५६७२ | ५१९९३ |
| ४. | भिवंडी | १८९८ | ११७६९ |
| ५. | शहादा | ७२०६ | ३१२०८ |
| ६. | कुसुंबे | २६२८ | १०७४८ |
| ७. | एदलाबाद | २०४४ | ३०८७९ |
| ८. | मेहकर | ५२८ | १०३० |
| ९. | बाळापूर | ११३११ | १८४३४ |
| १०. | दर्यापूर | १००६० | ९४५६ |
| ११. | मोर्शी | २३८२ | ९८१५ |
| १२. | काटोल | ४६६० | २२२०७ |
| १३. | राळेगाव | ३१८२ | ---- |
| १४. | किनवट | ५६७९ | ७६४४ |
| १५. | हदगाव | ३७४१ | २९१०७ |
| १६. | वसमत | ४८५० | २५५८३ |
| १७. | बदनापूर | ९८८३ | १३४६९ |
| १८. | पैठण | २३९६ | १६३५५ |
| १९. | बीड | ३६७१ | २७०६९ |
| २०. | जावळी | १५७१ | ७४८१ |
| २१. | औसा | ३४०७ | ११७३४ |
| २२. | उमरगा | ३३६९ | २९५६० |
| २३. | करमाळा | १५६३ | २७१०१ |
| २४. | शिराळा | २८६६ | ६९५१ |
| २५. | मिरज | २९९९ | २१५१० |
| २६. | तासगाव | ११३७० | १४४७१ |
| २७. | पन्हाळा | ५०८० | १४५८० |
| २८. | शाहूवाडी | ९४३८ | १४२८० |
| २९. | चंदगड | १५०७ | ६१२९ |
| ३०. | वाडा | ६८९९ | २८९८९ |
| ३१. | चोपडा | २०९८ | २३६३७ |
| ३२. | खामगाव | १००५९ | २५८३१ |
| ३३. | दौंड | २०३० | २६९४० |
| ३४. | पुरंदर | ५५३० | ३५०५३ |
| ३५. | वडगाव | ३९९० | २५८३३ |
| ३६. | वैजापूर | १५७२ | १९३७४ |
| ३७. | उमरखेड | २३६० | २५८०३ |
| ३८. | गडहिंग्लज | ६१७३ | २३३०२ |
| ३९. | रावेर | ३६२६ | १७२८७ |
| ४०. | बार्शी | ३४९९ | २९०६७ |
| ४१. | खटाव | २१५९ | २६७४२ |
| ४२. | कवठेमहांकाळ | २५८६ | २५१०३ |
| ४३. | जालना | ८१५० | १५४९९ |
| ४४. | मुखेड | ४५५८ | २४८०२ |
| ४५. | लातूर | ३६९६ | ३६८०६ |
| ४६. | तुर्भे | २३१३ | ९३८२४ |
| ४७. | शिवाजीनगर | ३२२ | ४८६९६ |
| ४८. | दिग्रस | ६३६ | १३६६४ |
| ४९. | पंढरपूर | १५३६ | ३५५४३ |

मूळ समझोत्यामध्ये यातील पहिल्या २९ जागा आणि शेवटच्या

१ जागा जनता पक्षाने सोडण्याची तयारी दर्शविली होती.

शेवटच्या तीन जागांवर शेकापने उमेदवार उभे करून नंतर माघार घेतली. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या त्यांना अनामत रक्कम गमवावी लागली.

● यातील केवळ दर्यापूर या जागी शेकाप फक्त ६०४ मतांनी पुढे आहे.

● राळेगाव ही जागा शेकापला एकतर्फी सोडलेली होती.

● मेहकर ही जागा जनता पक्षाने मित्र पक्षाला सोडलेली होती.

● किनवट, शिराळा व चंदगड या जागी जनता पक्ष पुढे असला तरी त्यानेही अनामत रक्कम गमावली.

● एदलाबाद, बाळापूर, लातूर, गडहिंग्लज व शहादा या जागा शेकापमुळे जनता पक्षाने गमविल्या.

● तर उमरगा, बार्शी, पंढरपूर, बदनापूर व रेणापूर या जागा जनता पक्ष ऐक्याच्या वातावरणात जिंकू शकला असता.

● यापैकी १५ जागा जनता पक्षाने, १ जागा मस्काने, १ जागा जनता बंडखोराने आणि एक जागा कारिपने जिंकली.

याशिवाय वाळवा, करवीर, परतूर व दिंडोरी या चार मतदार-संघांमध्ये शेकापने चांगली लढत दिली असली तरी जनता पक्षाचे उमेदवार या ठिकाणी आघाडीवर असल्यामुळे जनता पक्षाचे उमेदवार शेकापमुळे पराभूत झाले असेच म्हणावे लागले.

परांडा येथे शेकापचा उमेदवार विरोधात असतानाही जनता पक्ष विजयी झाला.

### लढविलेच नाहीत

शेकापला देऊ केलेल्या ७७ जागांपैकी पुढील मतदारसंघ शेकापने मुळी लढविलेच नाहीत.

१. सिन्नर २. निफाड ३. अचलपूर ४. यवतमाळ ५ आंबेगाव ६. हवेली ७. कोरेगाव ८. फलटण ९. कागल १०. वलगाव.

यातील वलगाव हा मतदारसंघ तर शेवटपर्यंत एकतर्फी सोडलेला होता.

### लोकप्रियता घटली

१९७२ साली शेकापने ५८ जागा लढवून ६% मते प्राप्त केली तर या वेळी ८८ जागा लढवून ५·०५% मते मिळविली. त्या ५८ मतदारसंघात तर या वेळी ४% पेक्षाही कमी मते मिळाली आहेत.

याचा अर्थ असा की, महाराष्ट्रात शेकापची ताकद घटत चालली आहे. मतदानाचे हे आकडे त्या दृष्टीने बोलके आहेत. जिंकलेल्या १३ व द्वितीय क्रमांकांच्या २२ अशा एकूण ३५ जागांवरच शेकापची काही ताकद आहे. यातही १७ जागा एकतर्फी सोडलेल्या होत्या.

शे. का. पक्षाच्या शक्तीचे आणि लोकसमर्थनाचे हे विश्लेषण लक्षात घेतले तर त्या वेळी एसेम जोशी यांचेच धोरण चुकीचे होते हे स्पष्ट होते.

इतउप्परही वादाकरिता 'एसेमच बरोबर होते' हा माहितगारांचा निष्कर्ष मानला तरी 'समझौता' मोडण्याचे खापर माहितगार एकट्या पूर्वाश्रमीच्या जनसंघवाल्यांवरच का फोडतात ?

जनता पक्षात 'समझौता' कोणालाच मान्य नव्हता. त्यात बहुतांश समाजवाद्यांचाही समावेश आहे.

फक्त एसेम आणि बापूसाहेब काळदाते यांचाच काय तो अपवाद.

कारण शेवटी एसेमच म्हणाले होते–

'धर्मराजाबरोबर शेवटी जसा कुत्रा गेला, तसा माझ्याबरोबर शेवटी फक्त बापू राहिला.'

मग या घटनेस फक्त जनसंघीयांना माहितगारांनी का जबाबदार धरले ?

यातून माहितगारांचा 'रंग' स्पष्ट होतो हेच खरे !

–सवाई माहितगार

राजधानी दिल्ली : प्रतिनिधी

# मोरारजी–चरणसिंग यांच्या दुसऱ्या भेटीनंतर

मोरारजी देसाई आणि चरणसिंग यांच्यातील दुसऱ्या भेटीचे वर्णन थोडीशी यशस्वी परंतु बरीचशी अयशस्वी असेच करावे लागेल. १७ जुलैला त्या दोघांची जी पहिली भेट झाली होती तिच्यातून फारसे काही निष्पन्न झाले नव्हते. परस्परांना भेटायला तयार नसलेले हे नेते तासभर एकत्र आले, एवढीच त्या भेटीची माफक फलश्रुती होती. त्या वेळी मोरारजीभाईंनी चरणसिंगांचे अगदी थंडे स्वागत केले होते. भेट आटोपल्यानंतर मोरारजीभाई चरणसिंगांना निरोप द्यायला बंगल्याच्या दारापर्यंतही आले नव्हते. त्यामुळे या दोन हट्टी व्यक्तींमध्ये पुन्हा विचारविनिमय तरी होतो किंवा नाही अशी शंका व्यक्त करण्यात येत होती; परंतु बिजू पटनाईक आणि मधू लिमये यांनी या दोघांची समजूत घालण्याचा शर्थीचा प्रयत्न केला आणि म्हणूनच त्यांची गेल्या शनिवारी सव्वा तास चर्चा होऊ शकली.

पहिल्या भेटीच्या वेळी मोरारजीभाई आणि चरणसिंग यांच्या व्यतिरिक्त कोणीच हजर नव्हते. या वेळी मात्र पटनाईक आणि लिमये यांनीही बोलण्यामध्ये भाग घेतला. मोरारजीभाईंनी चरणसिंगांना जर पुन्हा मंत्रिमंडळात घेतले नाही तर त्यांनी जनता पक्षातून बाहेर पडावे असे त्यांचे काही मित्र त्यांना सुचवीत आहेत. या गटाचे नेतृत्व श्यामनंदन मिश्रा आणि मनिराम बागडी यांच्याकडे आहे. उलट चरणसिंगांनी हे टोकाचे पाऊल उचलू नये; कारण त्यांच्या या कृतीचा

फायदा घेण्यासाठी इंदिरा गांधी टपलेल्याच आहेत असेही त्यांचे काही सल्लागार सांगत आहेत. मोरारजीभाईंना दुसऱ्यांदा भेटायला चरणसिंगांना राजी करण्याचे कार्य मुख्यतः या दुसऱ्या गटानेच पार पाडले. त्यामुळेच ही दुसरी भेट यशस्वी ठरली असे म्हटले जाते.

या बैठकीला जाताना पटनाईक आणि लिमये यांनी तडजोडीचा कच्चा आराखडा आपल्याबरोबर नेलेला होता आणि त्यावर मोरारजीभाई आणि चरणसिंग यांनी सह्या कराव्यात असा त्यांनी प्रयत्न केला, त्यात त्यांना यश आले नाही आणि म्हणून मोरारजीभाई–चरणसिंग यांच्यात आणखी एक भेट घडवून आणण्यात त्यांना पुढाकार घ्यावा लागणार आहे.

## दोन कारणे

चरणसिंगांनी आता आपला पूर्वीचा आक्रमक पवित्रा सोडून दिलेला असला आणि काहीसे नमते घेण्याची तयारी दर्शविली असली तरी तणावाला तेच मुख्यतः कारणीभूत आहेत आणि म्हणून त्यांनी मोरारजीभाईंची मागणी मान्य करण्याइतका समंजसपणा दाखविला पाहिजे, असे मध्यस्थीचा प्रयत्न करणाऱ्यांनाही वाटते. मोरारजीभाई दुखविले गेलेले आहेत ते मुख्यतः दोन कारणांमुळे. कांतिभाईंच्या व्यवहारांची चौकशी केली पाहिजे असे चरणसिंगांनी आपल्याला पत्र लिहून कळवावे हे मोरारजीभाईंना रुचलेले नाही. चरणसिंगांचे म्हणणे असे आहे की, 'मी कांतिभाईवर कोणताही आरोप केलेला नाही. लोक जे बोलत आहेत तेवढेच आपण मोरारजीभाईंना कळविले होते. या प्रकरणी त्या दोघांमध्ये जो पत्रव्यवहार झाला तो अद्याप अधिकृत रीतीने प्रसिद्ध झालेला नसला तरी त्यातील आशय गुप्त राहिलेला नाही. केवळ कोणी तरी आरोप करीत आहे म्हणून आपल्या मुलाच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यासाठी आयोग नेमणे मोरारजीभाईंना मान्य नव्हते. उच्चपदस्थांबाबत काही हितसंबंधी लोक अशी कुजबूज अधूनमधून करीतच असतात; तुमच्या कुटुंबियांसंबंधीही माझ्याकडे अशा तक्रारी आलेल्या आहेत, हे मोरारजीभाईंनी कळविल्यानंतर त्याबबतही चौकशी करून घ्यायला आपली तयारी असल्याचे चरणसिंगांनी उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रात नमूद केले. भ्रष्टाचारासंबंधी आपल्याला कमालीची घृणा आहे हे दाखविण्याच्या अट्टाहासापायी चरणसिंगांनी तशी तयारी दर्शविली असली तरी जोपर्यंत चौकशीआयोग नेमण्याइतका प्राथमिक पुरावा सादर केला जात नाही तोपर्यंत अशा तक्रारींची दखल घेण्याचे कारण नाही असे मोरारजीभाईंनी कळविल्यानंतर हे प्रकरण तेथेच मिटले होते; परंतु मोरारजीभाईंनी चरणसिंगांकडून मंत्रिपदाचा राजीनामा मागितल्यानंतर चरणसिंग एवढे संतापले की, कांतिभाईंच्या व्यवहाराची चौकशी करण्याची आपण सूचना केल्यामुळेच मोरारजीभाईंनी आपल्याला मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची कारवाई केली असल्याचा त्यांनी आरोप केला. मोरारजीभाईंचा आक्षेप आहे तो या आक्षेपाबद्दल. कांतिभाईंच्या व्यवहाराची चौकशी करावी या चरणसिंगांच्या सूचनेमुळे मोरारजीभाईंना मानसिक त्रास होणे स्वाभाविक होते; परंतु त्याचा, आपल्या राजिनाम्याशी चरणसिंगांनी संबंध जोडावा हे मोरारजीभाईंना संतापजनक वाटते.

दुसरे कारण घडले ते इंदिरा गांधींवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत चरणसिंगांनी जाहीर पत्रक काढले म्हणून. तसे पाहिले तर इंदिरा गांधींवर खटला दाखल करण्याची तातडी स्वतः चरणसिंगांनीच दाखवायला हवी होती; कारण गृहखाते त्यांच्याकडे होते, परंतु त्याबाबत ते काहीच बोलायला तयार नाहीत. इतकेच नव्हे तर मंत्रिमंडळाच्या बैठकीत आपली भूमिका मांडण्याचा संकेत झुगारून देऊन त्यांनी आपले पत्रक वृत्तपत्रांकडे प्रसिद्धीसाठी पाठविले. या पत्रातील भाषा अतिशय कडवट आहे. चरणसिंगांनी मंत्रिमंडळातील आपल्या सहकाऱ्यांचा उल्लेख 'नामर्दांचा कंपू' अशा शब्दांत केला. मोरारजीभाईंचा आक्षेप आहे तो या असभ्य शब्दयोजनेला. म्हणून कांतिभाईसंबंधी लिहिलेले पत्र आणि इंदिरा गांधींप्रकरणी प्रसिद्ध केलेले पत्रक चरणसिंगांनी मागे घेतल्यानंतरच आपण त्यांना मंत्रिमंडळात पुन्हा घेण्यासंबंधी विचार करू अशी मोरारजीभाईंनी भूमिका घेतलेली असून तिच्यातील तथ्य मध्यस्थांना नाकारता येत नाही.

चरणसिंग आता ती दोन्ही निवेदने मागे घ्यायला तयार झालेले आहेत; परंतु त्यातील आशय सर्वांना कळल्यानंतर ती मागे घेण्याने काहीच औचित्य साधणार नाही. म्हणून आपण त्यातील विधाने मागे घेत आहोत असे चरणसिंगांनी जाहीर करावे असा मोरारजीभाईंचा आग्रह आहे. पत्रे आणि पत्रक मागे घेण्याची तयारी दर्शविणाऱ्या चरणसिंगांनी हा आग्रह मान्य केला तरच त्या दोघांत समेट होऊ शकणार आहे. मोरारजीभाईंनी आपल्या या आग्रहापासून विचलित व्हावे याकरिता त्यांच्यावर दबाव आणण्यासाठी चरणसिंगांचे एक समर्थक मणिराम बागडी पुन्हा किसान-मेळाव्याची भाषा करू लागले आहेत. किसान-मेळाव्याचा बागुलबुवा निर्माण केला की, मोरारजीभाई माघार घेतील अशी जर बागडी यांची अपेक्षा असेल तर ती सफल होणार नाही. एक तर त्यांच्या या बनावाला राजनारायण किंवा चंद्रावती यांच्याकडून पाठिंबा मिळण्याचा संभव अत्यल्प आहे. मणिराम बागडी यांना हा किसान-मेळावा भरवायचा असेल तर त्यांना उत्तरप्रदेश आणि हरियाना येथील मुख्यमंत्र्यांची मदत घ्यावी लागणार आहे. रामनरेश यादव आणि देवीलाल तो धोका पत्करणार नाहीत. किंबहुना आपले मुख्यमंत्रिपद धोक्यात आलेले आहे असे दिसून येताच देवीलालनी किसान-मेळाव्यातून आपले अंग काढून घेतले होते. मध्यंतरीच्या काळात भजनलाल यांना आपल्या मंत्रिमंडळात घेऊन देवीलालनी आपले आसन बळकट केलेले असले तरी त्या प्रयत्नात त्यांनी जनसंघ-गटाला दुखविले आहे. अशा परिस्थितीत, चरणसिंगांच्या समर्थकांनी किसान-मेळाव्याचा चंग बांधला तर देवीलाल यांना आणि त्यांच्याबरोबर रामनरेश यादव यांनाही जनसंघाचा विरोध सहन करावा लागेल आणि त्याचा परिपाक या दोघांची आसने अस्थिर होण्यात होणार आहे. शिवाय संतप्त लोकनिदर्शने आयोजित करताना एकंदर वातावरणाचाही रागरंग पहावा लागतो. मोरारजीभाईंनी चरणसिंगांचा राजीनामा मागितला तेव्हा हरियाना आणि उत्तरप्रदेश येथे जी संतापाची लाट आलेली होती ती विरून गेलेली आहे. हे सारे लक्षात घेतल्यानंतर स्वतः चरणसिंगच मणिराम बागडींना सबुरीचा सल्ला देतील.

## अंगाशी आलेले डावपेच

आपल्यामुळे जनता पक्ष अस्तित्वात आला, आपल्यामुळे मोरारजीभाई पंतप्रधान झाले, चंद्रशेखर यांना आपणच पक्षाध्यक्ष केले अशी अहंकारी भाषा चरणसिंगांच्या तोंडून निघत असते. या साऱ्या प्रयत्नांच्या बदल्यामध्ये आपल्याला उपपंतप्रधानपद मिळावे अशी चरणसिंगांची अपेक्षा होती. ती भंग पावल्याची खात्री पटताच त्यांनी बंडाचा पवित्रा घेतला आणि हे बंड उग्र व्हावे म्हणून केंद्रीय कार्यकारिणी नि संसदीय मंडळ यांचा राजीनामा सादर केला. येथपासून चरणसिंगांचे डावपेच त्यांच्याच अंगाशी येत गेले. आपण कसेही

पृष्ठ २३ वर

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ विरोधी पक्षाची दारुण अवस्था

पंधरा ऑगस्ट १९४७ रोजी फाटके स्वराज्य पदरी घेतल्यापासून ते मार्च ७७ मधील निवडणुकांपर्यंत सत्तास्थानी असलेली मंडळी सत्तेवरून खाली खेचली गेली. मातब्बर विरोधक म्हणून ज्यांनी नाव मिळविले होते असे अटलजी, जॉर्ज फर्नांडिस, मधु दंडवते सत्तास्थानी जाऊन बसले. कालपर्यंत विरोधक असलेले मधु लिमये, ना. ग. गोरे, एस्. एम्. जोशी, रामभाऊ म्हाळगी सरकारी पक्षाचे नेते झाले. एस्. एम्., मधु लिमये प्रत्यक्ष सत्तास्थानी नसले तरी नव्याने बांधलेल्या पक्षाची जडणघडण करण्यात गुंतून गेले. विरोधी बाकांवर बसून विदुषकी चाळे करणारे राजनारायण काही काळ केंद्र-सरकारमध्ये मंत्री झाले. जुन्या सत्ताधीशांपैकी ज्यांनी वाहत्या वाऱ्याची दिशा ओळखली असे नेते आपल्या मूळ पक्षाची कात टाकून नवीन मंडळींबरोबर सत्तेमध्ये वाटेकरी झाले आणि बाकीच्या मंडळींवर विरोधी पक्षाची कामगिरी बजावण्याची वेळ आली. जनता पक्षाच्या एकूण कामगिरीबद्दल जसे फारसे चांगले बोलले जात नाही त्याचप्रमाणे विरोधी पक्षांबद्दलही फारशा चांगल्या प्रतिक्रिया ऐकायला मिळत नाहीत. एखाद्या प्रचंड वटवृक्षाप्रमाणे ऐसपैस पसरलेल्या काँग्रेस पक्षाची वाताहत झाली तरी ज्या वेळी नवीन लोकसभेमधील पक्षवार संख्याबलाचे चित्र स्पष्ट झाले त्या वेळी काँग्रेसला जबाबदार विरोधी पक्षाची भूमिका बजावावी लागेल हे पण दिसून आले. तथापी वर्षभरातील या पक्षाची कामगिरी नजरेखालून घातली तर एक नापाक विरोधी पक्ष म्हणूनच रोज झिजत चाललेल्या या पक्षाचा उल्लेख करावा लागेल. जुने विरोधक ज्या तडफेने भांडत असत, सभागृह हादरवून सोडीत असत, अभ्यासपूर्ण उपरोधिक भाषणांनी वातावरणात चैतन्य निर्माण करीत असत तसे काही काँग्रेस पक्षाला वर्षभरात करता आले नाही. विरोधी पक्ष म्हणून नेमके काय करायचे याबाबतच नेत्यांपासून कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांचा गोंधळ उडाला असताना सभागृहाबाहेर राहून 'आय एम द ओन्ली अपोझिशन' अशी गर्जना करणाऱ्या इंदिराजींनी गोंधळाचे-दादागिरीचे राजकारण सुरू केले आणि चव्हाणांच्या मागे बसलेली मंडळी हळूहळू पुन्हा माजी पंतप्रधानांच्या गोटात जाऊन बसली. स्टीफन हे वास्तविक पहाता दुय्यम दर्जाचे नेते; परंतु चव्हाणांची साथ सोडण्याच्या बदल्यात इंदिराजींनी त्यांना आपल्या पक्षाचे नेतेपद देऊ केले आणि त्यांनी चटकन पक्षबदल केला विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळविण्याइतकी संख्या इंदिराजींच्या गटाने आस्ते आस्ते मिळविली आणि विरोधी बाकांवर बसून मंत्रिपदाचे मानमरातब झेलणारे यशवंतराव तेथूनही हुसकले गेले! इंदिराजींचे चेले स्टीफन यांची तेथे वर्णी लागली. विरोधी पक्षाची अशी सुस्पष्ट वाटणी झाल्यावर इंदिराजींच्या पक्षाने आक्रमक धोरण स्वीकारले आणि दिल्लीमध्ये विरोधी पक्षाच्या अस्तित्वाची चुणुक जाणवू लागली. अर्थात हा झाला नंतरचा भाग. त्यापूर्वीची परिस्थिती मात्र अगदी वेगळी होती.

नवीन लोकसभा अस्तित्वात येऊन काँग्रेसचे नेते विरोधी बाकांवर येऊन बसताच चांगलेच गोंधळलेले होते. संख्याबल भरपूर कमी होऊन हातची सत्ता गेली असली तरी अनेक ज्येष्ठ नेते सभागृहामध्ये होते. सी. सुब्रह्मण्यम्, करणसिंग बरुआ, ब्रह्मानंद रेड्डी, हितेंद्र देसाई आदि मंडळी सभागृहामध्ये होती. नेतेपदी यशवंतरावांची बिनविरोध निवड झाली त्या वेळी सारा काँग्रेस पक्ष त्यांच्या पाठीशी संघटित होता; परंतु आणीबाणीचा वणवा काँग्रेसला केवळ सत्ताभ्रष्ट करून थांबला नाही तर त्याने या पक्षाला पूर्ण हतबल करून सोडले. नियमाप्रमाणे लोकसभेच्या एकूण जागांपैकी १० टक्क्यांहून जास्त जागा असतील तरच विरोधी गटाला सभागृहामध्ये पक्ष म्हणून मान्यता मिळू शकते. आजवर कोणत्याही विरोधी पक्षाला अशी मान्यता मिळाली नव्हती; परंतु काँग्रेसला अशी मान्यता मिळाली आणि त्या पक्षाच्या नेत्याला कॅबिनेटमंत्र्याचा दर्जा देण्यात आला. पराभूत झाला असला तरी पूर्वी कोणत्याही पक्षाजवळ नव्हते एवढे मोठे संख्याबल काँग्रेसजवळ होते. संसदीय व्यवहारात पूर्णपणे मुरलेला यशवंतरावांसारखा मुरब्बी नेता पक्षाजवळ होता. एवढे असूनही जनता पक्षाच्या सरकारला विरोधक जराही अस्वस्थ करू शकले नाहीत. विरोधी बाकांवर बसल्यावर आपल्या पक्षाचे नेते म्हणून चव्हाणांनी आणीबाणीला रामराम ठोकणारे जे पहिले भाषण केले त्या वेळी पंतप्रधानांना उद्देशून ते म्हणाले, 'देशाचा सन्मान आणि सामर्थ्य आज तुमच्या हाती आहे. तथापी मागील सरकारने जे काही चांगले केले त्यावर बोळा फिरवू नका आणि त्यांपैकी कित्येक चांगल्या गोष्टींच्या जडणीघडणीमध्ये तुमचाही हात होता हे विसरू नका!' विरोधी पक्षाच्या नेत्याला जे पाठबळ लागते ते चव्हाणांच्या पाठी होते. त्यांच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते तर त्यांच्याबरोबर होतेच; खेरीज वसंत साठे, के. पी. उन्नीकृष्णन्, के. लक्काप्पा यांसारख्या मंडळींची जोरदार दुय्यम फळीही त्यांच्या पाठीशी तयार होती. असे सगळे असूनही काँग्रेस प्रभावी व परिणामकारक विरोधी पक्षाची भूमिका बजावू शकली नाही.

### पराभूत न्यूनगंडाचे सावट

लोकसभा-निवडणुकीमध्ये जो पराभव पत्करावा लागला होता त्यामुळे काँग्रेस पक्ष सत्त्व हरवून बसला. तो केवळ सर्वसाधारण पराभव नव्हता. एखाद्या संवेदनशील माणसाकडून गुन्हा घडावा आणि पुढे

त्या गुन्ह्याची बोच त्याला सतत वाटत रहावी तसे काहीसे कॉंग्रेस पक्षाचे झाले होते. आणीबाणीच्या पापांच्या ओझ्याखाली दबलेला हा पक्ष चार महिने झाले तरी म्हणावी तशी उभारी घेईना. निवडणुकीपूर्वीपर्यंत पक्षाच्या सर्वेसर्वा असलेल्या इंदिराजी सभागृहाबाहेर असल्या तरी आपल्या पक्षाचे नरम धोरण आणि महत्त्वाच्या बाबतीत आपला सल्ला न घेण्याची वृत्ती त्यांना मुळीच मान्य नव्हती. राष्ट्रपतिपदाचा उमेदवार ठरविताना पक्षाने आपल्याला विचारले नाही ही गोष्ट त्या विसरू शकल्या नाहीत. काही हालचाल केली नाही तर जनता पक्ष व कॉंग्रेस पक्ष मिळून आपला पूर्ण निःपात करतील हे लक्षात येताच त्यांनी हालचालींना प्रारंभ केला. तरीही कॉंग्रेसच्या धोरणात फारसा फरक पडत नव्हता. बूड नसलेल्या अर्धवर्तुळाकार शिराळशेटासारखीच या पक्षाची अवस्था होती. बचावात्मक धोरणात फरक पडत नव्हता. जनता पक्षाच्या बाबतीत नरम असलेले साहेब—पराभूत व्यक्तींवर वाघांसारखे तुटून पडत होते. संघटना आणि संसदीय पक्ष या दोन्हीवर आपली मांड घट्ट झाली आहे हे लक्षात आल्यावर त्यांनी बाईंची उपेक्षा सुरू केली आणि लोकसभेमध्ये पक्षातर्फे बचावात्मक धोरण स्वीकारले गेले. सत्ताधारी पक्ष आक्रमक होता. विरोधी पक्षाला जे नैतिक बळ लागते ते कॉंग्रेसजवळ नसल्याने आणि लोकसभेत असलेल्या साऱ्याच्या साऱ्या नेत्यांची आणीबाणीपर्वामध्ये पूर्ण ससेहोलपट झालेली असल्याने या पक्षाला व त्याच्या ध्येयधोरणांना तेज चढेना. पराभूत मनोवृत्तीने पछाडलेले हे नेते जनता पक्षाच्या नवीन आव्हानासमोर हतबल झाले. सर्वसाधारणपणे प्रत्यक्ष जबाबदारी पडत नसल्याने विरोधी पक्ष नेहमी आक्रमक भूमिका घेतात. स्वतःचा बचाव करण्याची वेळ आली तरीही हा आक्रमक अभिनिवेश कायम ठेवावा लागतो; परंतु याउलट जनता पक्षाकडून होणाऱ्या उपरोधिक हल्ल्यापुढे कॉंग्रेस गर्भगळित झाली. पहिले जवळजवळ सात–आठ महिनेपर्यन्त जनता पक्षाने इंदिरा गांधी आणि आणीबाणी यांचे खाद्य पुरविले. तसे हा विषय हे एक दुधारी हत्यार होते. एका बाजूने पराभूत पक्षाच्या जखमांवर मीठ चोळले जात होते तर दुसऱ्या बाजूने इंदिरा गांधींच्या विरोधात व इंदिराजींच्या बाजूने असा कॉंग्रेस पक्ष चिरला जात होता. जानेवारी ७८ मध्ये इंदिरा कांग्रेसची स्थापना होण्यापूर्वीच या प्रक्रियेला प्रारंभ झाला होता आणि सत्ताधारी पक्ष हा कॉंग्रेसी तमाशा मजेत पहात होता. विरोधी पक्षाला तशी अजिबात संधी मिळाली नाही असेही नाही. निवडणूकमंडळाच्या दप्तरातून चरणसिंग यांनी आपले पत्र काढून घेतले. हे प्रकरण वास्तविक पहाता जेवढे तापले त्यापेक्षा किती तरी तापविता आले असते. बेलछी अत्याचाराचे जेवढे भांडवल बाईंनी सभागृहाबाहेर तयार केले त्याचा चवथा हिस्साही सभागृहात वातावरण तापू शकले नाही. सरकारच्या कारभारामधील आढळणाऱ्या दोषांची तीव्रता आणि त्यावर विरोधी पक्षांची प्रतिक्रिया यांचा मेळ बसू शकला नाही. प्रथम श्रेणीचे नेते सभागृहामध्ये आपला प्रभाव पाडू शकले नाहीत, तरी काही दुय्यम नेत्यांनी आपल्या अस्तित्वाची चुणूक दाखविण्यास प्रारंभ केला होता. सी. एम्. स्टीफन हे असेच एक नेते. खेरीज उन्नीकृष्णन, वायलर रवी या इंदिरा विरोधकांनी आपल्या अस्तित्वाची चुणूक दाखविली, तर आपल्या प्रखर इंदिरानिष्ठेचे ओंगळ प्रदर्शन करण्याची एकही संधी वसंत साठे यांनी दवडली नाही !

## विधानसभा निवडणुकांनंतर बदल

महाराष्ट्र–कर्नाटक आदि भागांमध्ये विधानसभा–निवडणुकांची जी दुसरी फेरी झाली त्यामधील धक्कादायक निकालांनी परिस्थितीमध्ये मोठा फरक पडला. या निवडणुकांमधील विजयामुळे इंदिरा कॉंग्रेसचे नैतिक बळ वाढले आणि हा पक्ष जास्त आक्रमक बनला. लोकसभेमध्येही पक्षाची ताकद वाढत गेली. अपेक्षेइतक्या गतीने ती वाढली नाही तरी आस्ते आस्ते हा पक्ष प्रमुख विरोधी पक्ष बनला आणि सभागृहामधील या पक्षाचे नेते सरकारला धारेवर धरू लागले. याचे अगदी ताजे उदाहरण म्हणजे चरणसिंग व मोरारजी यांच्यामधील पत्रव्यवहार : या प्रकरणाचे जास्तीत जास्त भांडवल करून त्यांनी हा पत्रव्यवहार पंतप्रधानांच्या इच्छेविरुद्ध विरोधी पक्षनेत्यांसमोर ठेवणे भाग पाडले. दुय्यम फळीवर असलेले स्टीफन अग्रस्थानी येऊन बसले आणि त्यांच्या आक्रमक धोरणाने आणीबाणीचे समर्थन करण्याएवढे धाडसी पाऊल उचलले. केवळ चार–सहा महिन्यांपूर्वीच आपण इंदिराजींच्या विरोधात होतो ही गोष्टही ते विसरून गेले. इंदिराजींच्या बाजूने उभे राहण्याची किंमत म्हणून त्यांनी इंदिराजींकडे त्यांच्या पक्षाचे नेतृत्व मागितले. इंदिराजींनी हसत ती किंमत दिली आणि मग स्टीफनसाहेबांनी इमानेइतबारे बाईंची सेवा सुरू केली. पक्षांतराला विरोध करणारे जे बिल लोकसभेमध्ये येत आहे त्याबाबत बोलताना स्टीफनसाहेबांनी महाराष्ट्रामधील फाटाफुटीचा निर्देश केला मात्र, पंतप्रधानांनी लगेच स्वतः स्टीफनसाहेबच पक्षांतराच्या या कलेत कसे चतुर आहेत याचा दाखला देऊन त्यांना त्यांची जागा दाखवून दिली. अर्थात या असल्या संदर्भामुळे स्टीफनसाहेबांच्या आक्रमक धोरणात फरक पडण्याचा संभव नाही. त्यांच्या पक्षाचे नेतृत्व सभागृहामध्ये त्यांच्याकडे असले तरी पक्षाचे धोरण इंदिराजी ठरवीत असतात. त्याची अंमलबजावणी गृहामधील नेत्याने आणि पक्षाच्या वसंत साठे व इतर सदस्यांनी करायची असते.

विरोधी पक्ष म्हणून काम करताना आपल्याला नेमके काय करायचे आहे याबावत इंदिरा कॉंग्रेसचे धोरण निश्चित होऊन त्याची कार्यवाही होत असल्याचे दिसत असले तरी चव्हाण कॉंग्रेस अजून दोलायमान अवस्थेमध्येच आहे. पूर्वी गृहामध्ये इंदिराजींवर जुने संदर्भ देऊन हल्ले चढविले गेले तर कॉंग्रेस केवळ बघ्याची भूमिका घेत असे. जनता पक्षाबाबतही थोड्याफार प्रमाणात फोडा आणि झोडाचे समीकरण राबविले गेले. टीका करताना प्रामुख्याने जनता पक्षामधील जनसंघीयांवर लक्ष केंद्रित केले जाई. याउलट जुन्या कॉंग्रेसवाल्यांबद्दल नरमाईचे धोरण असे. चरणसिंग यांना कैचीत पकडण्यासाठी आटापिटा केला जाई. चव्हाण, सुब्रह्मण्यम् आणि हितेंद्र देसाई यांनी काही काळ तरी यथाशक्ती प्रहार करण्याचे प्रयत्न केले; पण पक्ष विधानसभा–निवडणुकांमध्ये पराभूत होईपर्यंत पक्षाच्या नेतृत्व करणाऱ्या रेड्डींनी गृहामध्ये कधी तोंड उघडले नाही. अन्य प्रमुख नेतेही गृहामध्ये लक्ष घालीनासे झाले. स्वतःच्या पक्षामधील फाटाफूट थांबविण्यावर सारे लक्ष केंद्रित करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली.

कॉंग्रेस फाटाफुटीनंतर स्वतःला अधिकृत कॉंग्रेस म्हणविणाऱ्या

पृष्ठ २३ वर

# जनता पक्ष

## कार्यपद्धतीबाबत काही प्रश्न

वा. दा. रानडे

महाराष्ट्रात जनता पक्ष, त्याचे मित्रपक्ष आणि काँग्रेसमधील शरद पवार-गट यांच्या आघाडीचे सरकार अधिकारावर आहे. या प्रयोगासंबंधी काही विचार गेल्या अंकात प्रदर्शित केले. या संदर्भात आणखी काही महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधणे आवश्यक वाटते.

पहिला प्रश्न जनता पक्षाचे केंद्र-नेतृत्व आणि राज्य-नेतृत्व यांच्या संबंधांचा. एखाद्या राज्यासंबंधीचे महत्त्वाचे निर्णय कोणी घ्यावयाचे? राज्य-नेतृत्वाने की केंद्र-नेतृत्वाने, की दोघांच्या विचारविनिमयाने? राज्याच्या प्रश्नासंबंधात मुख्यत: राज्य-नेतृत्वानेच निर्णय घ्यायला हवेत. राज्यातील प्रश्नांची, परिस्थितीची, विविध राजकीय प्रवाहांची व त्यांच्या बळाची राज्य-नेतृत्वाला जवळून माहिती असल्याने अधिक अचूक कल्पना असते; पण सारेच निर्णय पूर्णपणे राज्य-नेतृत्वावर सोपवूनही चालणार नाही. पक्षाच्या राष्ट्रीय पातळीवरील धोरणाशी हे निर्णय सुसंगत आहेत की नाहीत? एखाद्या राज्यातील विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन निराळे धोरण स्वीकारावे लागणार असेल तर राष्ट्रीय पातळीवर त्याचे काय परिणाम होतील याचा विचार केंद्र नेतृत्वास करावा लागतो. तसेच व्यापक राष्ट्रीय भूमिकेचा विचार बाजूला ठेवून केवळ प्रादेशिक दृष्टिकोनातून निर्णय घेतला जात नाही ना हे पहावे लागते. प्रत्येक प्रश्नाच्या बाबतीत राज्य-नेतृत्वाने केंद्र-नेतृत्वाशी विचारविनिमय करून त्याच्या संमतीनेच निर्णय घेतले पाहिजेत अशी पद्धत अवलंबिणेही योग्य ठरणार नाही. कारण तसे करण्याने राज्य-नेतृत्वाला मग काही निर्णयस्वातंत्र्यच राहणार नाही; पण राष्ट्रीय पातळीवर ज्याचा परिणाम होण्याचा संभव आहे अशा प्रश्नांच्या बाबतीत निर्णय घेताना मात्र राज्य-नेतृत्व व केंद्र-नेतृत्व यांनी विचार-विनिमय करूनच ते घेण्याची प्रथा कसोशीने पाळली जाणे आवश्यक आहे.

हे सारे तात्त्विक विवेचन कशासाठी? महाराष्ट्रातील घडामोडींसंबंधात हे प्रश्न उपस्थित झालेले आहेत असे तुम्हाला म्हणायचे आहे का? तसे असेल तर हे प्रश्न तुमच्या मनातले आहेत. जनता पक्षाच्या कोणीही नेत्याने ते उपस्थित करून वाद निर्माण केलेला नाही. असे असता तुम्ही ते उपस्थित करून निष्कारण नसलेले संघर्ष निर्माण करीत आहात आणि पक्ष कमकुवत करीत आहात असा सवाल एखादा कार्यकर्ता करील. वरवर विचार केला तर त्याच्या-सारखेच अनेकांना वाटेल; पण जनता पक्षाच्या व्यापक हिताच्या व निकोप वाढीच्या दृष्टीने मला हे प्रश्न महत्त्वाचे वाटतात.

जनता पक्ष आणि काँग्रेसमधील पवार-गट यांची आघाडी करून मंत्रिमंडळ बनविण्याचा बनाव दिल्लीत प्रथम शिजला, पक्का झाला आणि राज्य-नेतृत्वाची संमती नंतर त्यास घेण्यात आली. चरणसिंग यांनी निर्माण केलेल्या पेचप्रसंगामुळे त्यांचा गट जनता पक्षातून बाहेर पडण्याची शक्यता दिसू लागली होती. हा गट बाहेर पडल्याने पक्षाची जी शक्ती कमी होईल ती काँग्रेस-मधल्या चव्हाण-गटाचे सहकार्य मिळवून भरून काढावयाची असा त्यामागे उद्देश होता. चव्हाण-गट लागलीच जनता पक्षात प्रवेश करील अशी अपेक्षा नव्हती; पण बाहेरून त्याने जनता-सरकारला पाठिंबा अगदी नेहमी नव्हे तरी कसोटीच्या प्रसंगी द्यावा असे जनता पक्षाच्या केंद्र-नेतृत्वाला वाटत होते; पण जनता पक्षाशी सहकार्य केवळ त्याच्या सोयीसाठी व फायद्यासाठी करायला चव्हाण गट कसा तयार होणार? त्याच्या मोबदल्यात त्यालाही काही किंमत मोजायला हवी. शरद पवारांना मुख्यमंत्रिपद आणि त्यांच्या गटास दहा मंत्रिपदे या गोष्टी जनता पक्षाच्या केंद्रनेतृत्वाने आधीच कबूल करून टाकल्या. राज्यनेतृत्वाशी त्याबद्दल विचारविनिमय करून मगच या बाबत अंतिम निर्णय घ्यावयास नको होता का? पण तसे काही घडलेले दिसत नाही. केंद्र-नेतृत्वाचा निर्णय मान्य करणे नाही तर त्याच्याशी संघर्ष करणे एवढाच पर्याय राज्य-नेतृत्वापुढे होता. जनता पक्ष सध्या एका पेचप्रसंगातून जात असता आणखी पेचप्रसंग नको म्हणून राज्यनेतृत्वाने या निर्णयास मान्यता दिली असे दिसते राज्यनेतृत्वाचा हा दुबळेपणा म्हणावयाचा की थोरपणा? या प्रश्नावर प्रथम राज्यनेतृत्वाशी विचार-विनिमय करून तुम्ही निर्णय घ्यायला हवा होता अशी जाणीव तरी राज्यनेतृत्वाने केंद्र-नेतृत्वास द्यायला हवी होती. मुख्यमंत्री कोण हे इंदिरा गांधींनी ठरवायचे आणि इतरांनी त्याला निमूटपणे मान्यता द्यावयाची अशी इंदिरा राजवटीतील पद्धती होती. शरद पवारांना मुख्यमंत्रिपद कबूल करताना जनता पक्षाचे केंद्रनेतृत्वही त्याच पद्धतीने वागले. पक्षाच्या कार्यपद्धतीच्या दृष्टीने हे योग्य घडले नाही. राज्य-नेतृत्वाला केंद्र-नेतृत्वाने डावलल्याची ही काही पहिलीच वेळ नव्हे विधानसभा निवडणुकीपूर्वी एस्. एम्. जोशींनी शे. का. पक्षाशी जागावाटपाचा करार केला होता. केंद्रनेतृत्वाने त्यास मान्यता न देता शे. का. पक्षास दिलेल्या जागा कमी केल्या. त्यामुळे काही ठिकाणी जनता व शे. का. प. उमेदवारांत आपसात लढती झाल्या. या लढती झाल्या नसत्या तर जनता व शे. का. प. दोघांनाही अधिक जागा मिळून काँग्रेसमधील एका गटाच्या पाठिंब्या-शिवाय जनता व मित्र पक्षांचे सरकार आणणे शक्य झाले असते.

शरद पवारांना मुख्यमंत्रिपद देण्याच्या प्रश्नावर जनता विधिमंडळ पक्षालाच निर्णय घेऊ द्या. केंद्रनेत्यांनी किंवा राज्यनेत्यांनी यासंबंधी निर्णय घेण्याची पद्धती योग्य नाही. वरिष्ठ नेत्यांनी निर्णय घ्यावयाचे आणि पक्षाच्या खालच्या शाखांनी किंवा समित्यांनी ते निमूटपणे मान्य करावयाचे ही लोकशाही पद्धती नव्हे, प्रत्येक पातळीवर लोकशाही पद्धतीने निर्णय घेण्याची प्रथा पाळायला हवी. केंद्रनेतृत्वाचा निर्णय राज्यविधि-मंडळ पक्षास मान्य झाला नाही तर आपली भूमिका समजून सांगण्यासाठी आपला एखादा प्रतिनिधी पाठवून केंद्रनेतृत्व विधि-मंडळ पक्षास आपल्या निर्णयाचा फेरविचार करण्यास सांगू शकते, पण या फेरविचारा-नंतर विधिमंडळ पक्ष जो निर्णय घेईल तो

पृष्ठ १० वर

# मानवी हक्क, रशिया व जनतापक्ष

राजन दातार

१ ऑगस्ट १९७५ रोजी सोव्हिएट युनियन व इतर ३३ राष्ट्रांनी हेलसिंकी येथे एका ऐतिहासिक करारावर सह्या केल्या, तेव्हा जगातील स्वातंत्र्यप्रेमी लोकांच्या अपेक्षा फार उंचावल्या. या करारामुळे रशिया व इतर पूर्वयुरोपीय कम्युनिस्ट राष्ट्रांवर मूलभूत मानवी हक्कांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आली. हेलसिंकी करारावर सह्या करणाऱ्यांनी तीन महत्त्वाच्या गोष्टी स्थूल मानाने मान्य केल्या. (१) व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य यांचा मान राखणे (२) माहिती व वृत्तपत्रीय बातम्यांची मुक्त व स्वतंत्र्य देवाण–घेवाण (३) या राष्ट्रांमधल्या लोकांमध्ये अधिक मानवी संबंधांना प्रोत्साहन देणे.

हेल्सिंकीचा करार फक्त कागद व शाईपुरताच मर्यादित राहणार हे काही दिवसांत उघड झाले. हेल्सिंकी करारानंतर चारच महिन्यांत प्रसिद्ध रशियन जीवशास्त्रज्ञ श्री.सेरेगी कोव्हालेव यांच्यावर खटला भरण्यात आला. त्यांच्यावर सोव्हिएट सरकार उलथून पाडण्याचा प्रयत्न करण्याचा आरोप ठेवण्यात आला. त्यांनी फक्त एकच गुन्हा केला होता. आन्द्राय साकारोव्ह या अणुशास्त्रज्ञाच्या मानवी हक्कासाठीच्या लढ्यात साह्य करून, बेकायदा (?) ग्रंथांचा प्रसार केला. कोव्हलेव म्हणाले की, 'सोव्हिएट घटनेतील कलम क्र. १२५ चा पुरस्कार करण्याकरिताच मी असे केले.' यावर सरकारी वकील थंडपणे म्हणाले, 'सोव्हिएट सरकार अशा 'अजब' प्रयत्नांनी परवानगी देत नाही.' कोव्हालेव ह्यांचा खटला विलनिअस, लिथुआनिया येथील कोर्टात रशियन शिरस्त्याप्रमाणे बंद दरवाज्याआड (Behind curtain) पार पडला. साकारोव्ह यांना कोर्टात प्रवेश नाकारण्यात आला. काव्हालेव यांना सात वर्षे सक्त मजुरी व तीन वर्षे एकांतवासाची शिक्षा ठोठावण्यात आली. साकारोव्ह नंतर म्हणाले 'हेल्सिंकीनंतर सोव्हिएट राज्यकर्त्यांनी आपल्या सामर्थ्याचा प्रत्यय आणून द्यावयाचा होता. त्यांच्यामध्ये त्यांनी स्वत: बनविलेल्या कायद्याचे स्वत:च उल्लंघन करण्याचा निर्घृण निर्लज्जपणासुद्धा आहे.'

आन्द्राय अमालरिक ह्या कथालेखकाची कहाणी वेगळी नाही. त्यांच्या 'Will the Soviet Union Survive Until 1984' या पुस्तकाला लोकशाहीवादी राष्ट्रांमध्ये प्रचंड प्रसिद्धी मिळाली. सोव्हिएट राज्यकर्त्यांना हे सहन होण्यासारखे नव्हते. अमालरिक ह्यांना सहा वर्षे सक्त मजुरी व तीन वर्षे सैबेरियामध्ये एकांतवासाची शिक्षा मिळाली. १९७५ मध्ये एकांतवासाची शिक्षा भोगल्यावर ते मॉस्को येथे परतले. पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध हद्दपारीचा आदेश काढला. सप्टेंबर १९७५ मध्ये त्यांना पुन्हा अटक करण्यात आली. सततच्या छळाला वैतागून अमालरिक यांनी देश सोडण्याची इच्छा व्यक्त केली. रशियातून सुटल्यावर ते म्हणाले, 'लेखक आपली जन्मभूमी कधीच सोडू शकत नाही. मला देश सोडावयाचा नव्हता; परंतु शेवटी विजय नतद्रष्टांचाच झाला!'

## बुकोवास्कीचा सौदा

व्लादीमियर बुकोवास्कीचा जन्म १९४२ साली झाला. मॉस्को येथे एका कम्युनिस्ट विचारवंताच्या घरात तो वाढला. सतराव्या वर्षी त्याने एक विनोदी नाटक लिहिले; तेही एक अंकी. त्याची शाळेतून लगेच हकालपट्टी करण्यात आली. त्याला खात्री पटली की, व्यक्तिस्वातंत्र्य ही वस्तू सोव्हिएट राष्ट्रात अस्तित्वात असूच शकत नाही!

१९६० मध्ये बुकोवास्कीने मॉस्को विद्यापीठात प्रवेश मिळविला. त्याने कित्येक 'बेकायदा' कवितासंग्रहांच्या प्रकाशनात मदत केली. प्रत्येक रविवारी मॉस्कोच्या प्रसिद्ध मायाकोव्हास्की चौकात या कवितांचे सामुदायिक वाचन सुरू झाले. १९६१ मध्ये त्याला विद्यापीठातून अर्थातच काढून टाकण्यात आले.

जून १९६३ मध्ये बुकोवास्की प्रथमच के. जी. बी. च्या तावडीत सापडला. त्याच्याजवळ The New Class या मिलोवान ड्जीलासच्या पुस्तकाच्या दोन फोटोप्रती सापडल्या. त्या पुस्तकावर सोव्हिएट युनियनमध्ये संपूर्ण बंदी आहे. बुकोवास्कीची लेनिनग्राडच्या एका वेडयांच्या इस्पितळात भरती करण्यात आली. ख्रुश्चेव्ह यांनी म्हटल्याप्रमाण 'आमच्याकडे कम्युनिस्ट राज्यपद्धतीचा विरोध कोणी करीत नाही, फक्त काही वेडया लोकांनाच त्रास सहन करावा लागतो.'

बुकोवास्कीने जवळजवळ ११ वर्षे वेडयाची इस्पितळे, तुरुंग व एकांतवास यात काढली. लेनिनग्राडच्या तुरुंगात त्याला वेडयांच्याबरोबर ठेवण्यात आले. 'सलफाझीन' या औषधाचे इंजेक्शन कैद्यांना वारंवार दिले जाई. ह्याचा उपयोग 'सहकार्य' मिळविण्याकरता होत असे. त्या तुरुंगात वेड न लागू देण्याचे बुकोवास्कीने ठरविले. त्याने इंग्लिश शिकण्यास सुरुवात केली. पंधरा महिन्यांनी त्याची सुटका झाली.

सुटका झाल्या झाल्या त्याने खुल्या खटल्याची मागणी केली व पुष्किन चौकात निदर्शनांची तयारी चालविली. तीन दिवस आधी, म्हणजे २ डिसेंबर १९६५ रोजी त्याला अटक झाली व वेडयांच्या इस्पितळात पुन्हा रवानगी झाली.

बुकोवास्कीची कहाणी जगात झिरपू लागली व आंतरराष्ट्रीय

निषेधाला कंटाळून बुकोवास्कीला साडेसात महिन्यांनंच सोडण्यात आले. सुटका होताच त्याने चार स्वातंत्र्यवादी मित्रांच्या अटकेचा निषेध करण्यासाठी निदर्शने केली. सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा आणल्याच्या आरोपावरून त्याला तीन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली.

बुकोवास्कीला बोर येथील तुरुंगात पाठविण्यात आले. मार्च १९७० मध्ये सुटका झाल्यावर त्याने के. जी. बी.विरुद्ध मोहीम हाती घेतली. के. जी. बी. ने त्याचा रीतसर छळ सुरू केला. त्याच्यामागे के. जी. बी. चे लोक सारखे पाळत ठेवीत. एका रात्री बुकोवास्की व अमेरिकन वार्ताहर जेम्स पाइपर्ट ह्यांना खूप मारण्यात आले. ह्या मारेकऱ्यामध्ये बहुतेक जण के. जी. बी. चे असल्याचे बुकोवास्कीने नंतर सांगितले. जानेवारी १९७२ मध्ये बुकोवास्कीवर खटला भरण्यात आला. खटला एका दिवसातच निकालात निघाला. त्याला वकीलही नाकारण्यात आला व साक्षीदारांच्या उलटतपासणीस प्रतिबंध करण्यात आला. त्याने कोर्टाला सांगितले, ' ह्या खटल्याची काहीच आवश्यकता नाही. मी माझ्या स्वातंत्र्याचा सौदा करणार नाही. मला एकाच गोष्टीची खंत वाटते. माझ्या सुटकेच्या काळात एक वर्ष दोन महिने, तीन दिवस – मी फारच थोडे कार्य करू शकलो. ' बुकोवास्कीला एकूण १२ वर्षांची शिक्षा झाली : दोन वर्षे तुरुंगवास, पाच वर्षे सक्तमजुरी व पाच वर्षे एकांतवास. स्टालिनच्या राजवटीत बुकोवास्कीला निश्चितच ठार मारण्यात आले असते. स्टालिन नाही तरी म्हणालाच होता : ' एक हत्या दुर्दैवी असते, एक लाख हत्या फक्त आकडेवारी असतात. ' बुकोवास्की त्या एक लाखामध्ये केव्हाच नाहीसा झाला असता !

यावर जगातून फार मोठ्या प्रमाणावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. शेवटी दि. १८ डिसेंबर ७६ रोजी बुकोवास्कीला लुईस कॉरवालान् लेप ह्या चिली कम्युनिस्ट पक्ष अध्यक्षाच्या बदल्यात झ्युरिच येथे सोडण्यात आले.

१९७२ साली अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन व रशियन कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष ब्रेझनेव्ह यांच्या भेटीतील हवा काढून घेतली ती आन्ट्राय साकारोव्ह यांनी. रशियन हैड्रोजन बॉम्बचा हा जनक जेव्हा भर चौकात राजकीय कैद्यांच्या वतीने उपोषणाला बसला तेव्हा साऱ्या जगाचे डोळे उघडले. १९७५ मध्ये साकारोव्ह यांना जागतिक शांततेला हातभार लावण्याकरिता नोबेल पारितोषिक देण्यात आले. रशियन राज्यकर्त्यांनी त्यांना हा मान घेण्यास देश सोडण्याची परवानगी नाकारली. हे पारितोषिक त्यांनी ' My Country and the World ' हा निबंध लिहिल्यावर तीनच महिन्यांत जाहीर करण्यात आले. ह्या लढ्यात त्यांनी सोव्हिएट राज्यपद्धतीवर झोड उठविली. साकारोव्ह यांना अटक किंवा वेड्यांच्या तुरुंगात रवानगी न होण्याचे कारण म्हणजे त्यांची एक शास्त्रज्ञ म्हणून असलेली किंमत. १९७३ पर्यंत त्यांना सर्व प्रकारच्या सुखसोयी उपलब्ध होत्या. त्यांनी स्वीडिश रेडिओला दिलेल्या मुलाखतीमुळे रशियन राज्यकर्ते रागावले. सरकारी वृत्तपत्रांनी त्यांच्याविरुद्ध मोहीमच उघडली. गुप्त पोलिसांपुढे त्यांना प्रश्नोत्तरांसाठी बोलावले जाऊ लागले. काही दिवसांपूर्वी साकारोव्ह पतीपत्नींना अटक झाली होती. एका खटल्याच्या दिवशी ते कोर्टाबाहेर उभे असताना त्यांना व इतर मित्रांना जबर मारहाण करण्यात आली. अजून साकारोव्ह यांच्यावर खटला भरण्यात आलेला नाही; पण त्यांना शास्त्रीय प्रयोगांपासून दूर करण्यात आले आहे. त्यांचा व त्यांच्या नातेवाइकांचा छळ करण्यात येतो. नव्या घटनेने मिळालेले अधिकार हे किती फसवे आहेत, हे दाखविणारा निबंध साकारोव्ह यांनी काही दिवसांपूर्वीच अमेरिकेत प्रसिद्ध करविला आहे.

अजूनसुद्धा रशियन राज्यकर्त्यांचा सूर बदललेला नाही. १४ व व १५ जुलै १९७८ या दिवशी म्हणजे ह्याच महिन्यात, दोन विरोधक–ॲलेक्झँडर गिन्सबर्ग व आनटोले शारान्सकी यांना अनुक्रमे १५ वर्षे व १३ वर्षांच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. दोन्ही खटले दोन दोन दिवसांतच संपले. नेहमीप्रमाणे खटले बंद कोर्टात झाले व नातेवाईक व मित्रांना कोर्टात प्रवेश नाकारण्यात आला. आनटोले शारान्सकी यांच्यावर गुप्तहेर असल्याचा आरोप ठेवण्यात आला. आनटोले शारान्सकी हा ज्यू. तो ज्यूंच्या हक्कांसाठी लढतो आहे. ॲलेक्झन्डर गिन्सबर्ग ह्याच्यावर 'देशविरोधी कारवाया' केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. गिन्सबर्गने ॲलेक्झँन्डर सोल्झेनित्सिन यांच्या परदेशप्रवासखर्चाचा निधी उभारला होता. वेळोवेळी, त्याला वेड्यांच्या इस्पितळातसुद्धा पाठविले गेले आहे.

## वृत्तपत्रीय स्वातंत्र्य

हेलसिंकी येथील करार करणाऱ्या राष्ट्रांनी माहिती व वृत्तपत्रीय बातम्या यांच्या मुक्त व स्वतंत्र देवाणघेवाणीला संमती दिली. ह्यामध्ये पुस्तके, वृत्तपत्रे व रेडिओ – टेलिव्हिजन प्रसारणे ह्याद्वारे परस्परसंबंध वाढविण्याचे ठरले. ह्यामुळे देशादेशांतील लोकांचे संबंध सुधारावेत हा हेतू होता.

हा करार झाल्यानंतर काही दिवसांतच रशियाने सर्व भ्रम दूर केले. सोव्हिएट युनियन ऑफ जर्नलिस्टसच्या ' जर्नलिस्ट ' ह्या मासिकात एक स्पष्टीकरण छापण्यात आले. त्यात स्पष्ट शब्दात लिहिण्यात आले होते की, पश्चिम युरोपीय साहित्य पूर्वयुरोपीय देशात ' सैद्धान्तिक कारणाकरिता ' प्रसिद्ध करण्यासारखे नाही. जे काही थोडे साहित्य रशियात जाते ते काही आंतरराष्ट्रीय विमानतळ व हॉटेलपुरते मर्यादित राहते.

रेडिओ व टी. व्ही. यांचे पद्धतशीरपणे ' जॅमिंग ' केले जाते. युरलच्या जवळ, युक्रेन झेकोस्लोव्हाकिया, बल्गेरिया, पोलंड, पूर्व-जर्मनी आदी देशांमध्ये काही ट्रान्समिटर्स ' वाह – वाह – वाह ' असा कर्कश आवाज सकाळी सहापासून रात्री अकरापर्यन्त प्रसारित करीत असतात. ह्या ट्रान्समीटर्सची संख्या जवळजवळ अडीच हजार एवढी आहे.

रशियामधल्या परदेशीय वृत्तपत्रप्रतिनिधींवरची बंधने सैल करण्याचे रशियाचे आश्वासन फारच फसवे ठरले आहे सत्य शोधण्यासाठी लागणारी पत्रकारिता करण्याचे स्वातंत्र्य अजून रशियात नाही. निःपक्ष मुलाखती घ्यायला परवानगी नाही. रशियन भाषा जाणणाऱ्या पत्रकारांना हा त्रास काही जास्त प्रमाणातच होतो. मुलाखत घेतलीच, तर के. जी. बी. चे लोक मुलाखत देणाऱ्याला तुरुंगात बंद करतात. हे सर्व, अर्थात भीती पसरविण्यासाठीच

असते. काही पत्रकारांवर चोरटी आयात, हेरगिरी, अमली पदार्थांची विक्री व आणखी कित्येक घाणेरडे आरोप केले जातात. काही दिवसांपूर्वी दोन अमेरिकन वार्ताहरांवर खटला भरण्यात आला आहे. त्यांच्यावर रशियन दूरचित्रवाणीची प्रतिष्ठा व विश्वासार्हता ह्यांना बाध आणल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.

### मानवी संबंध

हेलसिंकी कराराचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे करार करणाऱ्या देशांमध्ये आंतर राष्ट्रीय विवाह,कुटुंबाचे आपआपल्या मायदेशांमध्ये पुनर्वसन व प्रवासाला प्रोत्साहन देण्याचे ठरले.

ऑगस्ट १९७५ मध्ये, हेलसिंकी करारानंतर काही दिवसातच, युरी पाँडरिआशिक याने रशियन व्हिसा मागितला. आपल्या अत्यवस्थ आईला इस्रायलमध्ये भेटावयास जाण्याची त्याची इच्छा होती. हेलसिंकी करारात अशी स्पष्ट तरतूद आहे की, 'एखाद्या व्यक्तीच्या नातेवाइकाचा मृत्यू वा आजार झाला तर त्याला व्हिसा ताबडतोब देण्यात यावा.' युरीला व्हिसा नाकारण्यात आला. त्याची आई २८ ऑगस्टला इस्रायलमध्ये निवर्तली व तो मॉस्कोमध्येच राहिला. गॅरी ॲबलेव्ह यांना न्यूयार्क कॅन्सर रिसर्च सेंटरचे एक पारितोषिक मिळाले. २० ऑक्टोबर १९७५ रोजी हा समारंभ होता. सोव्हिएट सरकारने त्यांना परवानगी नाकारली. तसेच पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ व्हलंटिन दुरशीन यांना कोलंबिया विद्यापीठाने 'निमंत्रित शास्त्रज्ञ' म्हणून निमंत्रण दिले. त्यांना सुद्धा व्हिसा नाकारण्यात आला. अर्थात, विद्वान लोकांना सेमिनार्स व इतर कार्यक्रमांना धाडण्यासाठी त्यांच्यापाशी एकच गुण असला पाहिजे : 'सैद्धान्तिक स्थैर्य !'

म्हणूनच, हेलसिंकी करारानंतर मानवी हक्कांसंबंधीची अलंकारिक भाषा अस्तित्वात आलेली नाही. राजकीय कैद्यांच्या बाबतीत अजून काहीही बदल झालेला नाही. आज रशियन तुरुंगातून जवळजवळ दहा हजार राजकीय कैदी सक्त मजुरीच्या सजा भोगीत आहेत. अनेक कैदी अचानकरीत्या नाहीसे झाले आहेत. त्यांचे काय झाले ते कोणीच सांगू शकत नाही !

तरी सुद्धा, न्यायखात्याचे पहिले उपमंत्री ॲलेक्झँन्डर सुखारेव्ह म्हणतात 'आमच्या देशात स्वातंत्र्याच्या कल्पना व मानवी हक्क इतके सुरक्षित व व्यापक आहेत की, तथाकथित लोकशाहीवादी देशातला सामान्य माणूस त्यांची कधी स्वप्नातसुद्धा कल्पना करू शकणार नाही !'

डॉ. आंद्राय साकारोव्ह यांचे एक ज्येष्ठ सहकारी डॉ. युरी ऑरलॉव्ह यांना मे १९७८ मध्ये सात वर्षे सक्त मजुरी व तीन वर्षे सैबेरियात एकांतवासाची शिक्षा झाली होती. त्यांना दिनांक १६।७।१९७८ रोजी मॉस्कोच्या दक्षिणेला एका अज्ञात तुरुंगात पाठविण्यात आले. डॉ ऑरलॉव्ह हे हेलसिंकी कराराच्या अंमलबजावणीची मागणी करीत होते. ह्याच कारणास्तव हेलसिंकी ग्रुपचे युक्रेनमधले एक सदस्य सध्या तुरुंगात आहेत, त्यांचे नाव अजून कळलेले नाही, तथापी त्यांनी पंधरा वर्षे सक्तमजुरी भोगली आहे. त्यांचा खटला सुरू आहे किंवा लवकरच सुरू होईल.

ह्या सर्व प्रकाराने लोकशाहीवादी जगात खळबळ माजली आहे. अमेरिकन सेनेटने प्रचंड बहुमताने रशियाचा धिक्कार केला आहे. तसेच 'टास' या वृत्तसंस्थेने, एका कित्येक कोटी डॉलर्सच्या गणकयंत्राची मागणी नोंदविली होती, त्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली आहे. ब्रिटनमध्ये, परराष्ट्रमंत्री डॉ. डेव्हिड ओवेन यांना संसदेत निवेदन करण्यास भाग पाडण्यात आले. स्पॅनिश, फ्रेंच व इटालियन कम्युनिस्ट पक्षांनीसुद्धा ह्या खटल्यांचा स्पष्ट शब्दात धिक्कार केला आहे. आपल्याकडील कम्युनिस्ट पक्ष किती दुर्बल व ढोंगी आहेत हे पुन्हा एकदा सिद्ध झाले, परंतु त्यांचेकडून ही अपेक्षाच नव्हती. अपेक्षा होती ती जनता पक्षाकडून. ज्या ध्येय धोरणांचा पुरस्कार हा पक्ष करतो त्यांच्या कसोटीस हा पक्ष उतरू शकला नाही. जर नेपाळचे पंतप्रधान श्री. कोइराला यांच्या अटकेचा निषेध चंद्रशेखर, मधु लिमये वगैरे करू शकतात तर गिन्सबर्ग, ऑरलॉव्ह, व शारान्सकी यांच्या अटकेचा का नाही ? आपल्या परराष्ट्रमंत्रालयाच्या प्रवक्त्याने या खटल्यांवर भाष्य करण्यास नकार दिला आहे. कारण, हे खटले त्या देशाची 'अंतर्गत बाब' आहे. साधी नापसंती व्यक्त करण्याचे धैर्यसुद्धा परराष्ट्रखात्याने दाखवू नये, ही गोष्ट निश्चितच दुःखद व निराशाजनक आहे. □

---

## जनता पक्ष

पृष्ठ ७ वरून

मात्र केंद्र नेतृत्वाने मान्य करायला हवा. राज्यशाखेच्या निर्णयाबाबत सुद्धा हीच पद्धती अवलंबिण्यात यावी; पण पवारांशी आघाडी करण्याचा बनाव ज्या पद्धतीने घडला त्यात कोणालाच काही वावगे कसे वाटले नाही ? या बाबत उघडपणे तर नाहीच पण पक्षपातळीवर सुद्धा नापसंतीचा सूर कोणी काढल्याच्या बातम्या नाहीत. केंद्रनेतृत्वाचा कल समजल्यानंतर आघाडीची स्थापना होऊन शरद पवार नेते निवडले गेले हे खरे, पण आपला कल समजू न देता केंद्रनेतृत्वाने या बाबतीत विधिमंडळ पक्षाचा कल अजमावणे अधिक योग्य आणि लोकशाही संकेताशी सुसंगत झाले असते.

संसदीय जनता पक्षाच्या कार्यकारिणीची निवडणूक मे १९७९ पर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय सुद्धा असाच लोकशाही कार्यपद्धतीशी विसंगत आहे. कार्यकारिणी स्वतःचीच मुदतवाढ कशी करू शकते ? पक्षघटनेत तशी तरतूद आहे की नाही मला माहीत नाही, पण असली तरी ती सदोष म्हणावी लागेल. ज्यांनी कार्यकारिणी निवडली त्यांनीच मुदतवाढीबाबत निर्णय घ्यायला हवा. मतदानासाठी संसदीय पक्षाचे सभासद जमलेले होतेच. त्यांची तेथेच सभा घेऊन निर्णय घेणे सहज शक्य होते, पण आपला हा हक्क हिरावला गेला याबद्दलची जाणीवसुद्धा कोणाला झाल्याचे किंवा त्याबद्दल खंत वाटल्याचे दिसले नाही.

लोकशाही कार्यपद्धतीची जपणूक प्रत्येक पातळीवर होईल याबद्दल सर्वांनीच दक्ष असले पाहिजे. या बाबतीत गाफीलपणा किती धोक्याचा ठरतो हे आणीबाणीने आपणास दाखवून दिले आहे. जनता पक्ष-कार्यपद्धतीत असा गाफीलपणा राहू नये याच उद्देशाने या प्रश्नांकडे मी लक्ष वेधीत आहे.

□

परराष्ट्रीय घडामोडी । चंद्रशेखर पुरंदरे

# मॉरिटॅनियात सत्ताबदल

पश्चिम आफ्रिकेतील आकाराने मोठे पण महत्त्वाने नगण्य असे अॅटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावरचे मॉरिटॅनिया हे एक नमुनेदार आफ्रिकन राष्ट्र आहे. प्रथम ही फ्रेंचांची पश्चिम आफ्रिकेतील वसाहत होती. फ्रेंच साम्राज्यान्तर्गत स्वायत्तता या वसाहतीला १९५८ च्या नोव्हेंबर महिन्यात मिळाली आणि २८ नोव्हेंबर १९६० ला स्वातंत्र्य मिळाले. तेव्हापासून आजतागायत मॉरिटॅनियाचा मुख्तार उल् दद्दा हा अनभिषिक्त राजा होता. अठरा वर्षांपूर्वीच्या स्वातंत्र्यलढ्यापासून हा राजकारणात अग्रणी होता. गेल्या ९ जुलैच्या रात्री मात्र त्याच्या खुर्चीला धक्का लागला. लेफ्टनंट कर्नल मुस्ताफा–उल–सालेक याने मुक्तर–उल–दद्दा आणि त्याचे मंत्रिमंडळ यांना त्यांच्या घरीच स्थानबद्ध करून ठेवले आणि सर्व सूत्रे आपल्या ताब्यात घेतली. घानात याच सुमाराला झालेल्या रक्तहीन सत्तान्तराप्रमाणे (अॅचिमपाँगला जनरल अकुफाने हाकलले.) मॉरिटॅनियातही सत्तान्तर झाले.

या घटनेच आंतरराष्ट्रीय महत्त्व असे की, सहारा वाळवंटाचा मॉरिटॅनियाच्या सरहद्दीवर असणारा भाग, जो स्पॅनिश सहारा म्हणून आळखला जातो, तिथे सध्या चालू असलला युद्धखोरा बंद होण्याची शक्यता आहे.

गली तीन वर्षे या पश्चिम सहारामध्ये [Polisario] पॉलिसॅरिओ नावाची मुक्तिसंघटना मॉरिटॅनिया आणि मोरोक्को यानी व्यापलेला प्रदेश त्यांच्या वर्चस्वातून मुक्त करण्याच्या प्रयत्नात आहे. या पॉलिसॅरिओच्या गनिमी हल्ल्यांशी युद्ध करण्याइतकी मॉरिटॅनियाची लष्करी ताकद नाही. त्यामुळे मोरोक्कोच्या सैन्याची मदत घेऊन मॉरिटॅनिया हे न संपणारे युद्ध रेटीत आहे.

### लष्करी परावलंबित्व

मोरोक्कोचे ९,००० सैनिक मॉरिटॅनियात आहेत. मॉरिटॅनियातील सरहद्दीवरची खेडी हे तर मोरोक्कोच्या सैन्याचे तळच झालेले आहेत. स्पॅनिश सहाराच्या या युद्धातून मॉरिटॅनियाचा फायदा काहीही नाही. जानेवारी १९७६ मध्ये थोडा जास्त प्रदेश या दोन देशांना मिळाला पण तोही वाळवंटीच. युद्धाचा प्रतिकूल परिणाम मॉरिटॅनियाच्या आधीच कमकुवत असणाऱ्या अर्थव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात होत आहे. प्रामुख्याने खनिज लोखंडाच्या उत्पादनावर आणि निर्यातीवर मॉरिटॅनियाचे भवितव्य अवलंबून आहे. त्याचेच भाव आन्तरराष्ट्रीय बाजारपेठेत घसरल्याने मॉरिटॅनियाची अर्थव्यवस्था घसरली. त्यामुळे सौदी अरेबिया, युनायटेड अरब एमिरेट्स् आणि कुवेत यांच्या दातृत्वावर मॉरिटॅनिया आज जगत आहे. अशा परिस्थितीत स्पॅनिश सहाराबद्दल चालू असलेले युद्ध प्रत्यक्ष मॉरिटॅनियातच लोकांना नामंजूर झाले यात नवल नाही. लोकांचा असंतोष हळू हळू साठत होता. त्यात भरीस भर म्हणून पोलिसॅरिओ मॉरिटॅनिया आणि मोरोक्कोच्या सैन्याला वरचढ ठरत होती. त्यामुळे मॉरिटॅनियाच्या सैन्याचे नीतिधैर्यही खचलेले आहे. शेवटी मॉरिटॅनियाने फ्रेंचांना मदतीला हाक मारली. मॉरिटॅनियाच्या दक्षिणेला असणाऱ्या सेनेगलमध्ये उकार या ठिकाणी फ्रेंचांची झागुर जातीची विमाने तातडीने दाखल झाली. पोलिसॅरिओ गनिमावर हल्ला करून ही विमाने परत उकारला हजार होतात. मॉरिटॅनियाचा खनिज लोखंडाचा साठा सरहद्दीवर झूरेत या ठिकाणी आहे. तिथेही फ्रान्सने आपले इंजिनिअर्स घुसवलेले आहेत. या झूरेतपासून नुधाबी नावाच्या मोठ्या बंदरापर्यंत जी रेल्वेलाइन जाते, ती स्पॅनिश सहारा आणि मॉरिटॅनियाच्या सरहद्दीवरूनच जाते. हिच्या रक्षणासाठी फ्रेंचांच्या आणि मोरोक्कनांच्या देखरेखीखाली सैन्य आहेच.

### पॉलिसॅरिओ

मॉरिटॅनियन सरकारच्या नाकी नऊ आणणारी ही गनिमांची संघटना इतका काळ मोरोक्को आणि फ्रान्स यांच्या लष्करी हस्तक्षेपालाही बधली नाही. त्याचे एकमेव कारण म्हणजे तिच्या पाठीशी अल्जीरियाचे सामर्थ्य उभे आहे. अल्जीरिआ जर पाठीशी नसता, तर हे युद्ध केव्हाच संपले असते; पण अल्जीरिआही स्पॅनिश सहारावर वर्चस्व मिळवू इच्छितो. आतापर्यंत एकदा अल्जीरिया आजि मोरोक्को या प्रश्नावरून प्रत्यक्ष युद्धापर्यंत येऊन ठेपलेले होतेच. पोलिसॅरिओने धूर्तपणे मॉरिटॅनिआतील अन्तर्गत असंतोषाचा वास घेऊन त्याच्यावरचे हल्ले अलिकडे अधिक जोरात सुरू केले होते. या साऱ्याचा परिणाम होऊन मॉरिटॅनियात सत्तान्तर घडून आले. पोलिसॅरिओशी हातमिळवणी करून अल्जीरिआ लिबियाशी सामील होईल, अशी रास्त भीती मोरोक्कोला वाटत आहे.

या भीतीपोटीच मोरोक्कोच्या परराष्ट्रमंत्र्याने मॉरिटॅनियातील अनपेक्षित उलथापालथीनंतरही लष्करी परिस्थितीमध्ये यत्किंचितही फरक होणार नाही, अशी घोषणा तातडीने केली. मॉरिटॅनियात असलेला एकही सैनिक मागे घेतला जाणार नाही आणि पोलिसॅरिओशी युद्ध चालूच राहील, असे जाहीर केले.

मात्र मॉरिटॅनिआचा नवा सत्ताधीश सालेक याने अंमळ संदिग्ध भूमिका घेतल्याने स्पॅनिश सहारात शांततेची शक्यता निर्माण झाली आहे. रविवारी ९ जुलै रात्री उठाव करून त्याने सोमवारी सूत्रे ताब्यात घेतली. पोलिसॅरिओने ताबडतोब बुधवारी एकतर्फी युद्धबंदी जाहीर केली व सालेकबद्दल सदिच्छा प्रदर्शित केली. सालेकनेही जर गनिमांना शांतता हवी असेल तर आम्हालाही हवीच आहे, असा प्रतिसाद दिला. मात्र मोरोक्कोला न दुखविण्याची खबरदारी घेत या विधानाला सहाराचा प्रश्न मोरोक्कोबरोबरच सोडवू अशी पुस्तीही जोडली.

पण या भूमिकेमुळे युद्ध संपण्याची शक्यता

लगेच निर्माण झाली. निदान काही तरी राजकीय बोलणी होऊन तोडगा तरी निघेल, असे वाटू लागले. सालेकने आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सत्ता काबीज केल्याचे सांगितले आहे आणि युद्ध थांबविल्याखेरीज मॉरिटॅनियाची आर्थिक स्थिती सुधारणे अशक्य आहे.

### फ्रान्सचे महत्त्वपूर्ण स्थान

या सर्व आगामी घडामोडी पूर्णत: फ्रान्सवर अवलंबून आहेत. याचे कारण असे की; या विभागात शांतता प्रस्थापित करायची झाली तर तिला विरोध फक्त मोरोक्कोकडून होईल असे दिसते. कारण मोरोक्कोला स्पॅनिश सहारा अल्जीरियाच्या घशात घालायचा नाही.

या प्रश्नाशी संबंधित असणारी सगळी राष्ट्रे म्हणजे मॉरिटॅनिया, अल्जीरिया, मोरोक्को आणि लीबिया यांना जोडणारा फ्रान्स हा दुवा आहे. १२ जुलैलाच अल्जीरिआचा परराष्ट्रमंत्री बूतेफ्लिक फ्रान्सचा अध्यक्ष वॅलरि जेस्कार देस्ता याला भेटून आला आणि त्याने या विषयावर चर्चा करून या विभागात चिरस्थायी शांतता प्रस्थापित करण्याची इच्छा प्रदर्शित केली. तसेच सोमवारी १० जुलैला लिबियाचा क्रमांक दोनचा माणूस मेजर जलुद याने जेस्कार देस्तांची भेट घेतली आणि काही तासांतच पोलिसॅरिओने एकतर्फी युद्धबंदी जाहीर केली, ही घटना लक्षणीय आहे. जेस्कार देस्ता आणि मोरोक्कोचा राजा हसन यांचे वैयक्तिक संबंध चांगले असल्याने फक्त जेस्कार देस्तांच त्याची समजूत घालण्याचे काम करू शकेल, अशी शक्यता आहे.

एकूण पहाता स्पॅनिश सहारात अल्पावधीत गुणात्मक बदल घडून येईल असे दिसते; तशी शांतता स्थापन होण्याची चिन्हे दिसत काहेत. □

# □ मलेशियातील निवडणुका : एक फार्स

गेल्या ८ जुलैला मलेशियात निवडणुका पार पडल्या. मध्यवर्ती संसद आणि तेरापैकी दहा राज्य विधानसभांच्या निवडणुका घेतल्या गेल्या. निवडणुकांना फारसा काही अर्थ नव्हताच. उपचारार्थ व धूळफेक या दृष्टीने त्या पार पडल्या. कारण दोन आठवडे आधी त्या जाहीर झाल्या आणि ताबडतोब सार्वजनिक सभांवर बंदी घालण्यात आली. याला कारण मात्र असे देण्यात आले की, जर भाषणस्वातंत्र्य दिले, तर त्याचा विरोधक गैरफायदा घेतील. मलेशियावर प्रथम नॅशनल अलायन्स नावाचे अनेक पक्षांचे संयुक्त दल राज्य करीत होते. आता नॅशनल फ्रंट या नावाचे नवे संयुक्त दल राज्य करते. दहा पक्षांची ही मोट आहे आणि फक्त तीच राजकारण करण्यास व राज्यकारभार चालविण्यास समर्थ व लायक आहे, असे राज्यकर्त्यांचे प्रामाणिक मत आहे. मलेशियाचा गृहमंत्री गझली शेफी म्हणाल्याप्रमाणे सर्व विरोधक दुष्ट आणि अनावश्यक आहेत.

या दुष्ट आणि अनावश्यक विरोधकांचा काटा काढण्यासाठी निवडणुका जाहीर होताच बहुतेक जणांना 'राष्ट्रविरोधी व प्रक्षोभक' घोषणा दिल्याबद्दल व तसे विषय उपस्थित केल्याबद्दल अटकेत टाकण्यात आले व उरलेल्यांना उमेदवारी अर्ज चुकीचे भरल्याच्या नावाखाली निवडणुकीस अपात्र ठरविण्यात आले. अशा रीतीने नाममात्र विरोध वगळता निर्वीरमुर्वीतलम् झाल्यावर नॅशनल फ्रंट जिंकणार हे सरळच होते. तसेच झाले आणि नॅशनल फ्रंटला लागोपाठ पाचवा विजय मिळाला.

मात्र मागच्या वर्षीच्या विजयाइतका हा सणसणीत विजय नव्हता. इतर प्रमुख दोन पक्ष मलेशियात अस्तित्वात आहेत. एक म्हणजे पॅनमलेशियन इस्लामिक पार्टी आणि दुसरा डेमोक्रॅटिक अॅक्शन पार्टी (PMIP आणि DAP) PMIP अर्थातच धर्माधिष्ठित आहे. तिचा प्रमुख नेता दतुक अस्री हा उत्कृष्ट वक्ता आहे; पण सरकारच्या सभाबंदीमुळे तो निष्प्रभ ठरला. या पक्षाला विसर्जित संसदेत १३ जागा मिळाल्या होत्या त्या पाचवर येऊन ठेपल्या. तर DAP या पक्षाला प्रामुख्याने शहरी चिनी लोकांचा पाठिंबा मिळून ( मलेशिया व भिन्न वंशीय समाज आहे ) त्याची ताकद ९ वरून १५ वर गेली. नॅशनल फ्रंटने एकूण ११४ पैकी ९४ जागा जिंकल्या आणि हा तमाशा पार पडला.

निवडणुकांत कोणताच प्रश्न वादाला उपस्थित झाला नाही. कारण तसा प्रश्न विचारायला परवानगीच नव्हती. त्यामुळे मलेशियातील विविध वंशीय जमातींतील वैरभाव दृढ होण्यास केवळ मदत झाली.

मलेशियात एकूण लोकसंख्येच्या ३८% लोक चिनी आहेत. सरकारचे शिक्षणविषयक धोरण हा यांच्या असंतोषास कारण झालेला विषय आहे. सरकारी धोरणानुसार सर्व विद्यापीठांमध्ये ८५% जागा फक्त मलेशियनांना आणि उरलेल्या इतरांना मिळून देण्यात येतात. चिनी लोकांना स्वत:चे विद्यापीठ स्थापण्यासही परवानगी नाही. अशी कुचंबणा झाल्याने DAP तर्फे त्यांनी निषेध नोंदविला आहे.

आपल्याकडील आणीबाणीसारखीच स्मशानशांतता राखून 'प्रगती' करायचा दतुक हुसेन ओनच्या नेतृत्वाखालील सरकारचा विचार आहे. १९९० सालापर्यंत एक नवी अर्थव्यवस्था अमलात आणायची त्याची इच्छा आहे. या अर्थव्यवस्थेन्वये ३०% भांडवल मलाया लोकांच्या नियंत्रणाखाली, ४०% भांडवल मलाया नसलेल्या लोकांच्या नियंत्रणाखाली आणि ३०% परदेशी गुंतवणुकीत, याप्रमाणे विभागलेले असेल. ही अर्थव्यवस्था देशास उपकारक असे सरकारनेच ठरविलेले आहे आणि विरोध नावालाच शिल्लक असल्याने ती राबविण्यासाठी सरकार नव्या जोमाने सिद्ध होऊ पहात आहे.

या प्रस्थापित सरकारला खरी भीती फक्त भूमिगत कम्युनिस्ट पक्षाची आहे. राजकीय सभांवर बंदी घालण्याचे प्रमुख कारणही हेच होते. आता संसदेत व सर्व राज्यविधानसभांत निर्विवाद बहुमत मिळाल्यावर हाही विरोध नव्या दमाने दडपायला राजवट सुसज्ज होईल, यात शंका नाही. □

गेल्या महिन्यात बडोदा अॅमॅच्युअर क्लबने सार्त्रच्या या अत्यंत गाजलेल्या नाटकाचा एक प्रयोग मुंबईत सादर केला.

# ‘ क्राइम पॅशनल् ’च्या निमित्ताने

सौ. मीना सुधाकर देशपांडे

आपण भारतवासी निदान पन्नास वर्षांनी तरी जगाच्या मागे आहोत, असं म्हटलं जातं अन् इतर सर्व क्षेत्रांप्रमाणे साहित्याच्या बाबतीतही ही गोष्ट सत्य आहे, असं म्हटलं तर त्यात अतिशयोक्ती नसावी. ज्याँ पॉल सार्त्र ह्या सुप्रसिद्ध फ्रेंच लेखकाच्या महत्त्वाच्या सर्व वाङ्मयीन कृती १९३८ ते १९४८ ह्या काळात निर्माण झाल्या. सार्त्रने कथा, कादंबऱ्या, नाटके, कलाकृती, राजकारण व ह्या सर्वांबरोबरच अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे तत्त्वज्ञान अशा निरनिराळ्या विषयांवर लिखाण केले. दुसऱ्या महायुद्धात जर्मनांनी फ्रान्सवर वर्चस्व मिळविले. त्या वेळी सार्त्रने प्रत्यक्ष युद्धात भाग घेऊन तुरुंगवास भोगला. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर त्याने फॅसिस्टविरोधी चळवळीत भाग घेऊन निरनिराळ्या प्रकारे लोकजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सहकाऱ्यांच्या सहकार्याने मॉडर्न टाइम्स हे वृत्तपत्र चालविले. लेखकाला भोवतालच्या परिस्थितीपासून वेगळे राहताच येणार नाही, ही त्याची धारणा होती. त्याची मतप्रणाली कम्युनिस्ट विचारसरणीकडे झुकणारी असूनसुद्धा त्याने आपले स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व राखण्याचा सतत प्रयत्न केला. त्यामुळे सार्त्रने अनेकांचे रोष, अनेकांची टीकास्त्रे स्वतःवर ओढवून घेतली. १९६४ साली सार्त्रला नोबेल प्राईझ देण्यात आले होते, पण तात्विक कारणांमुळे त्याने ते स्वीकारण्याचे नाकारले. अशा ह्या महान लेखकाच्या कृतींबद्दल, विशेषतः नाट्यकृतींबद्दलची जाणीव मराठी रंगभूमीच्या चाहत्यांना अगदी अलीकडे झाली आहे. अर्थात It is never too late ह्या म्हणीप्रमाणे, उशीरा का होईना पण मराठी प्रेक्षकांना सार्त्रच्या कलाकृती मराठी रंगभूमीवर अवतरताना बघून नक्कीच आनंद व्हायला हवा. साहित्यक्षेत्रात मधून मधून विशिष्ट लेखकांच्या लाटा उसळत असतात. तशी सार्त्रची लाट सध्या आलेली आहे. विशेषतः प्रायोगिक रंगभूमीच्या चाहत्यांच्या मुखावर सध्या सार्त्रचेच नाव खेळत आहे. त्यामुळे दरवर्षी गाजणाऱ्या महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेतून सार्त्रची नाटके सादर केली जावीत, हे ओघानेच आले. ‘क्राइम पॅशनल्’ हे सार्त्रचे सर्वांत गाजलेले नाटक यंदाच्या स्पर्धेत बडोदा अॅमॅच्युअर क्लबतर्फे सादर केले गेले व त्या नाटकाने दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. नुकतेच हे नाटक पहाण्याचा योग आला आणि आधी वाटलं होतंच, त्याप्रमाणे पदरी निराशा आली. सध्या ज्या नाटकाला सरकारी स्पर्धेत मान्यता मिळते ते नाटक सर्वांत उत्तम, असा एक रूढ समज झालेला आहे, परंतु सरकारी स्पर्धेत ज्या प्रकारे बक्षीसपात्र नाटके निवडली जातात त्या गोष्टींबाबत जास्त खोलात शिरण्यात अर्थ नाही. कारण तो एक मोठा वादाचा विषय आहे. मुख्य प्रश्न हा आहे की, एखाद्या गाजलेल्या विदेशी लेखकाच्या गाजलेल्या कृतीला मराठी रंगभूमीवर योग्य न्याय मिळतो किंवा नाही. सार्त्रसारख्या लेखकाच्या नाटकांचे भाषांतर करणे आणि ते रंगभूमीवर सादर करणे ही एक फार मोठी जबाबदारी आहे. क्राइम पॅशनल हे मूळ नाटक १९४८ च्या एप्रिलमध्ये पॅरिसच्या रंगभूमीवर आले आणि त्याचे हजार प्रयोग झाले. वाङ्मयीन कलाकृती म्हणून ते जितके श्रेष्ठ आहे, तितकेच ते अत्यंत नाट्यपूर्ण आहे. ह्या नाटकात राजकीय विचारसरणी अन् तत्त्वज्ञान ह्याचा अत्यंत कौशल्यपूर्ण मिलाफ झालेला आहे. किंबहुना सार्त्रच्या बहुतेक सर्व कलाकृतींमध्ये वरील दोन्ही विचारसरणींची सांगड घातलेली दिसते. त्यामुळे त्याच्या नाटकाचे भाषांतर करताना ह्या विचारसरणी योग्य प्रकारे उकलून दाखविता आल्या नाहीत, तर ते भाषांतर केवळ शब्दशः भाषांतरच राहील. ‘क्राइम पॅशनल्’ ह्या नाटकातील राजकीय विचारांची बैठक ही फ्रान्समधील तत्कालीन निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या वैचारिक संघर्षावर, जो सार्त्रने प्रत्यक्ष अनुभवला होता, त्यावर आधारलेली आहे. ह्या कारणामुळे तसं पाहिलं तर ह्या नाटकाला कितीही मराठी रूप द्यायचा प्रयत्न केला तरी ते मराठी मातीतलं नसल्यामुळे परकीयच वाटणार. त्या मानानं तत्वज्ञानाची बैठक ही जास्त जवळची वाटण्यासारखी आहे. त्यामुळे ह्या नाटकाचे मराठीकरण करणे ही एक अत्यंत अवघड बाब आहे. त्याचप्रमाणे नाटकातील निरनिराळ्या पात्रांचे व्यक्तिदर्शन घडविण्यासाठी दिग्दर्शन करताना अनेक लहान-सहान बारकावे लक्षात घ्यावे लागतात. मूळ लेखकाने त्या बाबतीत नाटकात दिलेल्या कित्येक सूचना लक्षात घेतल्या गेल्या नाहीत, ह्यातच दिग्दर्शनाच्या कमकुवतपणाची जाणीव होते. तेव्हा मुळातले हे दोन महत्त्वाचे भाग कच्चे राहिल्यामुळे कलाकारांना फारसे कौशल्य दाखविण्यासाठी काहीच शिल्लक रहात नाही. कोणत्याही लेखकाची फक्त एकच कलाकृती त्याच्या व्यक्तिमत्त्वापासून, त्याच्या संपूर्ण वाङ्मयीन जीवनापासून वेगळी काढताच येत नाही. कोणतीही एक कलाकृती समजून घ्यायची असेल तर संपूर्ण लेखक समजून घेतल्याशिवाय ती पूर्णपणे जाणून घेता येणे अशक्य आहे. सार्त्रच्या सर्व लिखाणाची बैठक अस्तित्ववादाच्या तत्त्वज्ञानावर आधारलेली आहे. त्यामुळे ही तत्त्वज्ञानाची बैठक समजावून न घेता सादर केलेल्या

कलाकृतीचे काय होते, याचे मराठी 'क्राइम पॅशनल्' हे उत्तम उदाहरण आहे. त्यामुळे एक चांगले नाटक वाया गेल्याच्या जाणीवे-व्यतिरिक्त ह्या नाटकाचा मनावर इतर कुठलाच परिणाम साधला जात नाही.

परंतु प्रस्तुत लेखामध्ये कुणावरही टीका करण्याचा हेतू नसून त्या निमित्ताने मूळ नाटकाची मराठी वाचकांना ओळख करून द्यावी येवढाच हेतू आहे.

### सात प्रवेश

मूळ नाटक Les Mains Sales ऊर्फ 'क्राइम पॅशनल्' हे एकूण सलग अशा सात प्रवेशात विभागले गेलेले आहे. नाटकाचे कथानक फ्लॅश बॅक पद्धतीने उलगडते. नाटकाच्या घटना १९४३ ते १९४५ च्या दरम्यान पूर्व युरोपमधील इलिरिया ह्या काल्पनिक देशात घडतात. नाटकाच्या पहिल्या प्रवेशात कामगार पक्षाचा एक तरुण बुद्धिवादी सभासद ह्युगो बेरीन हा त्याची सहकारी व एके काळची प्रेयसी ओल्गा हिच्या घरी येतो. तो नुकताच तुरुंगातून सुटून आलेला असतो. होडेर ह्या त्याच्या पक्षाच्या एका पुढाऱ्याचा खून केल्याबद्दल त्याला पाच वर्षांची शिक्षा झालेली असते; पण चांगल्या वर्तणुकी-मुळे ह्युगोची दोन वर्षांनंतर सुटका होते. त्याच्या मागावर असलेले पक्षाचे काही सभासद त्याचा पाठलाग करीत ओल्गाकडे येतात. ओल्गा त्यांच्याकडून तीन तासांची मुदत मागून घेते. ह्या तीन तासांचे अवधीत ह्युगोने होडेरचा नक्की कोणत्या कारणासाठी खून केला अन् त्या बाबतीत आता त्याचा दृष्टिकोन बदलला आहे की काय, की ज्यामुळे त्याला निर्दोष ठरविता येईल व पुढील कार्यासाठी पक्षाला त्याचा उपयोग करून घेता येईल हे ओल्गाला जाणून घ्यायचे असते. ती पुन्हा पुन्हा ह्युगोला जसं घडलं तसं सांगण्यास प्रवृत्त करते आणि तिथूनच मूळ कथानकाला सुरुवात होते.

दुसऱ्या प्रवेशात ह्युगो हा पक्षाच्या मुखपत्रासाठी काम करताना दिसतो. क्रांतिकारी चळवळीत पडलेल्या इतर साऱ्या बुद्धिवादी लोकांप्रमाणे ह्युगो स्वतःच्या अप्रत्यक्ष व क्रियाशून्य भूमिकेबद्दल असंतुष्ट आहे. एखाद्या प्रत्यक्ष कृतीत त्याला भाग घ्यायचा आहे. तसं करता आलं तरच स्वतःच्या जगण्याला काही तरी अर्थ प्राप्त होईल असे त्याला मनापासून वाटतं. पक्षाचा एक पुढारी लुई त्याला तशी संधी देतो. पक्षामध्ये दोन तट पडलेले असतात. दुसऱ्या तटाचा पुढारी होडेर हा पक्षाशी बेइमानी करण्याच्या विचारात आहे, असं लुई ह्युगोला सांगतो. राजशाही पक्ष आणि उदारमतवादी पक्ष ह्यांच्याशी हातमिळवणी करून एक मध्यवर्ती सरकार स्थापन करून जर्मनांशी मुकाबला करण्याचा होडेरचा बेत असतो. ह्युगो हे ऐकताच भयंकर संतापतो. तत्त्वाच्या विरुद्ध वागणाऱ्या व तडजोड करणाऱ्या माणसाचा काटा काढला पाहिजे, असे तो बोलून जातो. 'तू हे काम करू शकशील?' असं लुईने विचारताच तो एक क्षणाचाही विचार न करता होकार देतो. त्याला ह्यातून प्रत्यक्ष कृतीची संधीच चालून आल्यासारखं वाटते. ह्युगो हा विश्वासू माणूस आहे आणि तो हे काम करू शकेल, अशी ओल्गा लुईला खात्री देते. गावाबाहेर एका लहानशा घरात कडेकोट बंदोबस्तात रहाणाऱ्या होडेरकडे त्याचा सेक्रेटरी म्हणून ह्युगोला पाठवायची योजना आखली जाते. 'तुमच्या कुणाच्याही मदतीशिवाय मी हा खून करीन', असे ह्युगो त्यांना ठामपणे सांगतो.

तिसऱ्या प्रवेशात होडेरच्या घरी ह्युगो आपली बायको जेसिका हिच्यासह येतो. ह्युगोचं सामान आवरताना जेसिकाला त्याच्या बॅगेत पिस्तूल सापडते. त्या पिस्तुलानं ह्युगो होडेरचा खून करणार आहे, ह्यावर तिचा विश्वासच बसत नाही. किंबहुना ह्युगो आयु-ष्यात कधी काही करू शकेल, अशी तिला मुळीच खात्री नसते. ह्युगो अन् जेसिकाचा संसार म्हणजे एक भातुकलीच्या खेळासारखा खोटा आहे. ती दोघंही कधी एकमेकांकडे गंभीर दृष्टिकोनातून बघूच शकत नाहीत. त्यांचं आयुष्य म्हणजे सतत खोटा खोटा आव आणून लुटुपुटीचा खेळ खेळल्यासारखं आहे. तेवढ्यात होडेरचे दोन शरीर-रक्षक – जॉर्जेस अन् स्लिक – तिथं येतात. होडेरच्या हुकमाप्रमाणे ह्युगोची खोली तपासायच्या निमित्ताने ते जरी तिथे आले असले तरी वास्तविक ह्युगो हा बुद्धिवादी बूर्ज्वा असल्याबद्दल त्याची हेटाळणी करण्याचाच त्यांचा खरा हेतू असतो. तर खोली तपासताना रिव्हॉल्वर सापडेल, ही ह्युगोला भीती असते. ही गोष्ट त्याच्या स्वाभिमानाला रुचण्यासारखी नसते, म्हणून खोली तपासली तर आपण आपल्या कामाचा राजीनामा देऊ, अशी ह्युगो धमकी देतो. जॉर्जेस व स्लिक पेचात पडतात आणि अखेर होडेरला बोलवून आणतात. होडेर ह्युगोचीच बाजू घेतो व जेसिका व ह्युगो ह्यांनी आपल्याकडे पिस्तूल नसल्याबद्दल दिलेल्या आश्वासनावर विश्वास ठेवतो. लोकांवर विश्वास ठेवायची आपली पद्धत आहे, असे होडेर सांगताच ह्युगोला आश्चर्याचा धक्का बसतो व नकळतपणे त्याला होडेरबद्दल आकर्षण वाटू लागते. होडेर व त्याचे शरीररक्षक निघून गेल्यानंतर जेसिका ह्युगोची हेटाळणी करते व खऱ्याखुऱ्या माणसांना तोंड देताना ह्युगोचा चेहरा किती पहाण्यालायक झाला होता म्हणून त्याला खिजविते. ह्युगोची कुचेष्टा करण्याची एकही संधी जेसिका सोडीत नाही. त्याद्वारे तिच्या मनात ह्युगोबद्दल असणारे असमाधान एकसारखे व्यक्त होते अन् ह्याउलट 'होडेर किती सामान्य माणूस आहे', असं ती म्हणते. तरीसुद्धा आपल्या नवऱ्याच्या तुलनेत होडेर खऱ्याखुऱ्या रक्ता-मांसाचा माणूस आहे, हे तिला प्रत्यक्ष जाणवतं अन् तिच्या मनात त्याच्याबद्दल शारीरिक आक-र्षणाचं बीज मूळ धरतं.

चौथ्या प्रवेशात ह्युगोला होडेरकडे येऊन दहा दिवस झालेले आहेत. तरीसुद्धा त्याला होडेरला मारण्याचे धैर्य झालेले नाही. तो ऑफिसमध्ये काम करीत असताना जेसिका ह्युगोला पिस्तूल आणून देते अन् त्याला होडेरला मारण्याची आठवण करून देते; परंतु त्या दिवसात ह्युगोला होडेरबद्दल अधिकाधिक आकर्षण वाटत चाललेलं असतं. स्वतःच्या अस्तित्वशून्य जीवनाच्या तुलनेत होडेरला खरंखुरं शारीरिक अस्तित्व असल्याचं ह्युगोला जाणवतं. होडेर जे काही करतो त्याला खरा अर्थ असतो. त्याच्या साऱ्या वस्तूंना खरं अस्तित्व आहे, असं त्याला वाटतं. ह्याउलट होडेरला आपल्या जिवाला धोका असल्याची पूर्णपणे जाणीव आहे. ह्युगोसुद्धा कदाचित आपला भावी मारेकरी असण्याची शक्यता आहे, असं तो ह्युगोला सूचकपणे बोलून दाखवितो. राजकीय पुढाऱ्याच्या जीवनाचा तो एक अपरिहार्य भाग आहे अन् ह्या सत्य परिस्थितीची आपल्याला जाणीव आहे, असं होडेर ह्युगोला सांगतो. जीवन जसं आहे तसं त्याचा स्वीकार करण्याची होडेरची तयारी आहे. ह्याच सुमारास होडेरकडे राजशाही

व उदारमतवादी ह्या पक्षांचे दोन प्रतिनिधी बोलणी करण्यासाठी येतात. बोलणी चालू असताना होडेर ह्युगोला तिथंच थांबायला सांगून त्याच्यावर आपला विश्वास असल्याची पुन्हा एकवार प्रचिती देतो. वाटाघाटी पूर्ण होऊन बोलणी संपत येतात तेव्हा ह्युगोला कळून चुकतं की, होडेर तत्त्वाच्या विरुद्ध वागून तडजोड करू बघत आहे व अशा रीतीनं पक्षाशी विश्वासघात करू बघत आहे. हे लक्षात आल्यानं ह्युगो खिशातील पिस्तूल काढणार तोच कुणी तरी बाहेरून बाँब फेकते अन् होडेर ह्युगोला जमिनीवर खेचून त्याला वाचवितो. त्या क्षणी जेसिका धावत येते अन् विचारते, 'होडेर मेला ?' त्यावर होडेर शांतपणे उत्तर देतो, 'तुझा नवरा सुरक्षित आहे.' ह्युगो निराशेच्या भरात दारू पिऊन आपल्या निष्क्रियतेला विसरून जाऊ बघतो.

पाचव्या प्रवेशात ह्युगोच्या खोलीत ओल्गा येते तेव्हा ह्युगोच्या लक्षात येते की, तो बाँब ओल्गानंच टाकला होता. ह्युगो खून करण्यास असमर्थ आहे, हे समजून आल्यामुळेच ओल्गानं बाँब टाकायचं ठरवलं. ह्यात ह्युगोही कदाचित मेला असता; परंतु ह्युगो भ्याड आहे, हे तरी निदान कुणाला कळलं नसतं, असं तिला वाटतं. ह्या साऱ्या प्रकारामुळे ह्युगोच्या पूर्ण ध्यानात येतं की, तो कदाचित रागाच्या एका क्षणी होडेरला मारू शकला असता; पण ओल्गाने बाँब टाकल्यामुळेच तो तसं करू शकलो नाही. पण असं मनाचं कितीही समाधान केलं तरी तो स्वतःला फसवू शकत नाही. आपण होडेरचा जाणून-बुजून कधीही खून करू शकणार नाही, हेही ह्युगोच्या ध्यानात येतं. ओल्गा त्याला ताकीद देऊन निघून जाते अन् होडेर उदास मनःस्थितीत ह्युगोशी बोलायला येतो. त्याच्याबरोबर आपल्या पुढील बेतांबाबत चर्चा करतो. त्याबाबत दोघांमध्ये वादविवाद होऊन पुन्हा एकवार होडेर ह्युगोचं मन जिंकतो. क्रांतिकारी संघटना रक्तपात करूनच सत्ता मिळवू शकतील, ह्या ह्युगोच्या समर्थनाला होडेर उत्तर देतो की, सत्ता मिळविण्यासाठी जे जे मार्ग अवलंबावे लागतात ते सर्व चांगलेच असतात. परचक्रापासून देशाची सुटका केल्यानंतर प्रस्थापित सरकारात फक्त नावापुरता भाग घेऊन छुप्या मार्गानंच सत्ता काबीज केली पाहिजे, अशी त्याची कल्पना असते. कोणत्याही राजकीय पक्षाला सत्ता मिळविण्यासाठी खोटं बोलावंच लागतं अन् आपल्या बदलत्या धोरणानुसार कामगारांशी काही वेळेला प्रतारणा करावीच लागते. युद्धामध्ये सेनापती त्यांच्या सैनिकांना प्रत्येक लहान-सहान गोष्टी सांगत बसत नाही. ह्युगोसारख्या अनभिज्ञ तरुणानं पावित्र्याच्या अन् सत्याच्या गोष्टी बोलणं ठीक आहे; पण राजकारणात हात बरबटून घ्यावेच लागतात–विशेषतः जिथं हजारो जीव वाचविण्याचा प्रश्न असतो तिथं ! होडेरच्या ह्या विचारसरणीनं ह्युगो भडकतो आणि पुन्हा एकवार तो पिस्तुल काढणार तोच स्लिक अन् जॉर्जेस येतात अन् पुन्हा ह्युगोचा बेत फसतो.

सहाव्या दृश्यात जेसिका होडेरच्या खोलीत येते. होडेरच्या बोलण्याची तिच्यावर पूर्णपणे मोहिनी पडते अन् तिला कळून चुकतं की, खरा पुरुष असावा तर असा ! होडेर तिला निघून जायला सांगतो. ती ह्युगोला कसलीही इजा करू नकोस, अशी होडेरला विनंती करते अन् त्याच्याकडचे असलेले पिस्तूल काढून द्यायला सांगते. आपल्याला पहिल्यापासूनच ह्युगोचा बेत माहीत आहे, असं तो जेसिकाला सांगतो आणि ह्युगोचं मन न दुखवता त्याचं मतपरिवर्तन करण्याचं तो तिला वचन देतो. जेसिका निघून गेल्यानंतर ह्युगो येतो व होडेर त्याला सरळ सरळ जबाब विचारतो, 'विचार अन् तत्त्वं किती सहजपणे बदलतात हे माहीत असूनसुद्धा तू केवळ मतं जुळत नाहीत म्हणून खून करशील ?' तो ह्युगोला असं विचारताच ह्युगो अवाक् होतो. 'खुनी कधी घडविले जात नाहीत, तर ते जन्मावे लागतात ! बुद्धिवादी माणूस नेहमीच विचार करीत असतो. तू पिस्तुलाचा चाप ओढण्याआधीच तुला तुझ्या कृत्याचे परिणाम दिसू लागतील. तू कधीच खून करू शकणार नाहीस !' असं सांगून होडेर मुद्दाम पाठ वळवून ह्युगोला पिस्तूल मारायची संधी देतो; पण ह्युगो खून करू शकत नाही.

ह्युगो सरळ कबुली देतो की, त्याला होडेरबद्दल विलक्षण आस्था वाटते, आदर वाटतो. ह्या सर्व गोष्टींवर विचार करण्यासाठी तो बाहेर निघून जातो अन् हे सर्व बोलणे चोरून ऐकत असलेली जेसिका पुन्हा आत येते. कोणत्याही राजकीय भानगडीत स्वतःला गुंतवून न घेणारी जेसिका होडेरबद्दल वाटणाऱ्या शारीरिक आकर्षणामुळे नकळत सर्व प्रकरणात गुंतली जाते अन् होडेरला स्वतःचं चुंबन घेण्यास प्रवृत्त करते. त्याच क्षणी ह्युगो आत येतो अन् जेसिकाला होडेरच्या मिठीत पाहून होडेरच्या साऱ्या वर्तणुकीचा उलटा अर्थ लावतो व संतापाच्या भरात होडेरचा खून करतो. होडेरचे शरीररक्षक धावत येतात पण ह्युगोला वाचविण्यासाठी होडेर मरताना खोटं सांगतो की, 'मी जेसिकाबरोबर झोपलो म्हणून ह्युगोनं माझा खून केला! '

शेवटच्या प्रवेशात पुन्हा ओल्गाचे घरी ह्युगो आपली कथा सांगून संपवताना दिसतो. "आपण होडेरचा खून कशासाठी केला हे आपल्याला अजूनही कळलं नाही. केवळ मत्सराच्या भरात आपण खून केला, की आपल्या मनात खून करायचा होता व त्याला मत्सर हे केवळ निमित्त मात्र झालं ? होडेरचा खून होणं हा केवळ योगायोग होता. जर होडेरच्या खोलीत आपण दोनच मिनिटं अगोदर आलो असतो किंवा नंतर आलो असतो तर ? म्हणूनच आपलं स्वतःचं कृत्य हे आपण केलं असं मला वाटतच नाही. न समजता केलेलं कृत्य म्हणजे न केल्यासारखंच आहे."

ह्युगोचे हे विचार ऐकताच ओल्गा सुटकेचा श्वास टाकते व ह्युगो माफीस पात्र असल्याचा निर्वाळा देते. फक्त एक गोष्ट त्यानं स्वीकारली पाहिजे आणि ती म्हणजे पक्षाचं धोरण बदललं आहे, ही वस्तुस्थिती. "जेव्हा ह्युगोला खुनाच्या कामगिरीवर पाठविण्यात आलं होतं त्या वेळी रशियाशी संबंध तुटले होते. त्यानंतर आता ते पुन्हा जोडले गेले आहेत आणि राजशाही पक्षाशी हातमिळवणी करण्याचा रशियाने आदेश दिलेला आहे. होडेरची विचारसरणी बरोबर होती, हे आता पक्षाच्या ध्यानात आलं आहे. होडेर आता पक्षाचा महान नेता ठरला आहे. त्याचा एका प्रतिगामी पक्षाच्या खुन्यानं खून केला, अशी त्यांनी पक्षाच्या सभासदांची समजूत करून दिली आहे," असं ओल्गा सांगताच ह्युगो ही वस्तुस्थिती स्वीकारण्याचं नाकारतो व म्हणतो, "होडेरला का मारलं हे आपल्याला अजून समजलं नसल्यामुळं होडेरला अजून आपण मारलेलंच नाही. खऱ्या अर्थानं ओल्गानं सांगितल्याप्रमाणे वागण्याचं आपण ठरविलं नाही तरच खऱ्या अर्थानं होडेर मेला असं होईल." अखेर लुई ओल्गाचा निर्णय ऐकण्यासाठी येतो तेव्हा ह्युगो त्यांना ओरडून सांगतो– 'मी क्षमेस पात्र नाही !' स्वतःच्या कृतीचा अर्थ पूर्णपणे जाणून घेता क्षणीच ह्युगो स्वतःच्या कृतीचं पूर्णपणे

समर्थन करू शकतो. आपण जे केलं ते मान्य करून आणि त्याबद्दल मरण पत्करून ह्युगो अखेर होडेरचा जाणून-बुजून, खऱ्या अर्थानं खून करतो.

## कौशल्यपूर्ण रचना

'क्राइम पॅशनल्' हे नाटक अत्यंत रोमांचकारक अन् विलक्षण नाट्यपूर्ण आहे ह्युगो होडेरला मारणार की नाही, ह्या ताण प्रेक्षकांच्या मनावर एकसारखा वाढविण्यासाठी सार्त्रने नाटकाची रचना अत्यंत कौशल्यपूर्ण केलेली आहे. होडेरला मारण्याची ह्युगोला अनेकवार संधी मिळूनसुद्धा तो त्याचा खून करू शकत नाही, ह्या गोष्टीशी ह्युगोच्या व्यक्तिमत्त्वाची घडण निगडित झालेली आहे. ह्या बाबतीत ह्युगोचे हॅम्लेटशी विलक्षण साम्य आहे. अत्यंत भावनाप्रधान हळव्या मनाचा आणि बुद्धिवादी ह्युगो एखादा निर्णय घेण्याच्या क्षणी हॅम्लेटइतकाच अगतिक आणि असहाय्य होतो. शेवटचा अंतिम उत्कर्षाचा बिंदू जेसिकाच्या आपल्या नवऱ्याबद्दलच्या असमाधानातून किती कौशल्याने साधला गेला आहे ! जी जेसिका साऱ्या प्रकरणात स्वतःला अलिप्त ठेवू पहाते, तीच अखेरीस ह्युगो व होडेर ह्यांच्यामध्ये निर्माण होऊ पाहणारा जिव्हाळा, समजूतदारपणा नष्ट करते. एकीकडे होडेरबद्दल वाटणारे विलक्षण आकर्षण आणि दुसरीकडे त्याच्या मतांबद्दल वाटणारा तिटकारा ह्या दोन्ही भावनांमध्ये ह्युगोची एकसारखी ओढाताण चालू आहे. आदर्श राजकीय पुढारी कसा असावा, ह्याबद्दल सार्त्रच्या कल्पना होडेरच्या रूपाने साकार झाल्या आहेत. होडेर ज्या विश्वात रहातो किंवा जे कार्य करतो त्याबद्दल त्याच्या मनात मुळीच भ्रामक समजुती नाहीत. कधी कधी राजकीय कारणासाठी खूनही करावे लागतात, हे त्याला माहीत आहे आणि राजकारणाला संपूर्णपणे वाहून घ्यायचं असेल तर उथळ तारुण्यातील पावित्र्याच्या कल्पना, ज्या ह्युगोच्या मनात सतत आहेत, त्या झुगारून दिल्या पाहिजेत. राजकारणाकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोन अत्यंत व्यवहारी आहे. शत्रूशी चार हात करायचे असतील तर संख्याबल वाढवूनच जिंकलं पाहिजे, हे त्याला माहीत आहे. खोटं बोलावं लागण्याबद्दल त्यालाही वाईट वाटतं. परंतु ज्या समाजाची रचना वर्गावर आधारित आहे, तिथे खोटं बोलावं लागणं अपरिहार्य आहे. होडेरची राजकारणाकडे बघण्याची दृष्टी ह्युगोच्या पूर्णपणे विरोधी आहे ह्युगो स्वार्थासाठी राजकारणाकडे वळलेला आहे. आंधळेपणाने पक्षाचे नेतृत्व स्वीकारताना स्वतःच्या मनात निर्माण होणारी वादळं तो थांबवू बघतोय.

आदर्श राजकीय पुढाऱ्याचं प्रतीक म्हणून सार्त्रने होडेर ही व्यक्ती निर्माण केली आहे, तर त्याला स्वतःला कम्युनिस्टांबद्दल आलेले अनुभव ह्युगोच्या रूपानं व्यक्त होतात. सर्व लोकांना सन्मानानं जगता यावं म्हणून पक्षात प्रवेश केल्याबद्दल स्लिक अन् जॉर्जेस ह्युगोची कुचेष्टा करतात. कम्युनिस्ट पक्षात बुद्धिवाद्यांना हीन लेखलं जातं, ह्याची ते त्याला वारंवार जाणीव करून देतात.

'क्राइम पॅशनल्'चा अर्थ सार्त्रला विचारण्यात आला तेव्हा राजकारणात साध्य व साधन ह्यांच्या परस्पर संबंधाविषयीच्या प्रश्नावर हे नाटक असल्याचे त्याने सांगितले. व्यक्तिशः त्याला स्वतःला होडेरचे विचार पटतात आणि ते हे की, राजकारणात पडलेल्या माणसाला स्वतःचे हात बरबटून घ्यावेच लागतात; पण केवळ हे तत्त्व मांडण्यासाठीच म्हणून त्यानं नाटक लिहिलेले नाही. नाटकाचा शेवट सार्त्रने संदिग्धच ठेवला आहे. त्यामुळं सार्त्रच्या चाहत्यांनी आणि विरोधकांनीही नाटकाचा, स्वतःला पाहिजे तसा अर्थ लावलेला आहे, जो सार्त्रला कधीच अपेक्षित नव्हता. जवळ जवळ प्रत्येकालाच ह्या नाटकातून कम्युनिस्टविरोधी सूर सापडला आणि ज्या अर्थी कम्युनिस्टांनी ह्या नाटकावर जोरदार हल्ला केला त्या अर्थी त्यांच्या नाकाला मिरच्या चांगल्याच झोंबल्या असणार. नाटकाचे शेवटी, ज्या पद्धतीने पक्षाचं धोरण बदलते ते होडेर जिवंत असता तर त्याला अमान्य झालं असतं, असं वाटत नाही. कारण तो एक धूर्त, व्यवहारी, राजकारणी पुरुष आहे. ह्युगोसारख्या ध्येयवादी तरुणानं अशा प्रकारे तत्त्वासाठी सामोरं जाणं हेही होडेरला कधीच पटलं नसतं. उलट ह्युगो जर होडेरच्या सहवासात दीर्घकाळ राहिला असता तर अखेर ह्युगोचंही मतपरिवर्तन होऊन त्यानं सत्यपरिस्थिती स्वीकारली असती.

'क्राइम पॅशनल्' हे केवळ राजकीय विषयावरचंच नाटक नसून त्याच्यामागे तत्त्वज्ञानाचीही बैठक आहे. ह्युगोनं होडेरचा खून करणे, ह्या घटनेला स्वतःचं असं काहीच महत्त्व नाही. कोणतेही कृत्य जोपर्यंत त्याला कुणी अर्थ मिळवून देत नाही, तोपर्यंत निरर्थक अन् संदिग्धच रहातं. त्या कृत्याकडे बघण्याचा एक विशिष्ट दृष्टिकोन जोपर्यंत कुणी धारण करत नाही, तोपर्यंत ते कृत्य न केल्यासारखंच आहे. प्रत्येक कृतीमागचा हेतूच त्या कृतीला अर्थ प्राप्त करून देतो. परंतु 'होडेर हा केवळ योगायोगानं मरण्यासारखा माणूस नाही; असा माणूस स्वतःच्या विचारांसाठी अन् तत्त्वांसाठी मरत असतो. मी जर ह्या मारण्यामागचा हेतू पूर्णपणे जाणून घेतला तरच होडेरला साजेसं असं मरण प्राप्त होईल,' असं म्हणून ह्युगोनं मरण स्वीकारणं म्हणजे त्याला होडेरच्या विचारांचा खरा अर्थ समजलाच नाही, असा होतो. ह्युगोच्या मरणाला तात्पुरतं उदात्त स्वरूप मिळून जातं; परंतु अशा एका क्षणापुरत्या उदात्त कृत्यामुळं ह्युगोची सत्याला सामोरं जायची अक्षमता दिसून येते. दररोज घडणाऱ्या प्रत्येक कृतीतूनच माणसानं स्वतःवरची जबाबदारी पार पाडली पाहिजे. ती जबाबदारी केवळ एक नेत्रदीपक, उदात्त मरण स्वीकारून पार पाडता येत नाही. असं करणं म्हणजे स्वतःच्या कृतीतून निर्माण होणाऱ्या परिणामांना सामोरं जाऊन तोंड देण्यासारखं आहे. सार्त्रच्या राजकीय व तत्त्वज्ञानाच्या प्रगल्भ विचारसरणीतून पाहिलं तर ह्युगोसारख्या व्यक्तीचं कृत्य न पटण्यासारखं आहे; परंतु तरीही दुसरा विचार मनात येतो की, कुठलीही तडजोड न करता तत्त्वासाठी मरण स्वीकारणारी माणसं आज-कालच्या जगात अशी कितीशी आहेत ? व्यावहारिक दृष्टिकोनातून त्यांच्याकडे पाहिलं तर ही माणसं मूर्ख वाटतील. व्यवहाराच्या जगात जगण्यास ती नालायक वाटतील; परंतु सामान्य माणसाला जसं जगता येत नाही, इच्छा असूनही तो जे करू शकत नाही, अशा माणसाला आपल्या सर्व सुप्त उत्कट आकांक्षा ह्युगोच्या रूपानं साकार झाल्यासारख्या वाटतील. त्यामुळं सार्त्रला स्वतःला होडेरबद्दल सहानुभूती वाटत असल्याचं उघड उघड दिसलं तरी सामान्य प्रेक्षकाला अथवा वाचकाला ह्युगो भावनिक पातळीवर स्पर्श करून जातो अन् तोच अखेर मनामध्ये चिरकाल स्मरणात राहतो.

'क्राइम पॅशनल्' ह्या सरळ सरळ दोन विचारसरणींचा संघर्ष आहे. कुणाला त्यापैकी एक बाजू पटेल, तर कुणाला दुसरी पटेल. आणि अखेर ह्या विचारसरणींच्या संघर्षातून निष्पन्न काय होईल हे सांगणंही कठीण आहे. किंबहुना सार्त्रच्या कुठल्याही वाङ्मयीन कलाकृतीचं हेच वैशिष्ट्य आहे की, वाचकांसमोर दोन विचारसरणी मांडून कुठल्याही निष्कर्षाप्रत न येता तो वाचकांना विचार करायला लावतो. त्यामुळं त्याच्या कलाकृती अखेरीला काहीशा अपुऱ्या वाटतात; पण त्यातच सार्त्रचं कौशल्य आहे. कारण जी गोष्ट मनाला चटका लावते, जी अपुरी अपुरी वाटते, जी विचार करायला लावण्याच्या मार्गावर आणून सोडते, तीच मनात दीर्घकाळ रेंगाळत रहाते. □

पुस्तके

# सलाम

## विचारांचा प्रवास सुरू करणारी पाडगावकरांची कविता

डॉ. निशिकांत मिरजकर

आर्नल्डने एके ठिकाणी म्हटलेले आहे की, चांगली कविता केवळ क्षणिक भावनानुभव देत नाही; ती मनाला अस्वस्थ करते. अंतर्मुख बनविते. चित्तवृत्ती बदलून टाकते. वाचून संपली तरी तिची आवर्तने मनात खोल कुठे तरी चालूच राहतात. अर्थात हे अस्वस्थ करणे वेगवेगळ्या स्तरांवरचे असणार, हे उघड आहे. तुकारामांचे अभंग, बालकवींची निसर्ग-कविता, मर्ढेकरांची यंत्रयुगीन कविता आणि पु. शि. रेग्यांची प्रेमकविता या साऱ्या आपापल्या परीने अस्वस्थ करणाऱ्या कविता आहेत. आपल्या अनुभव-कक्षेतल्या जीवनाचा अपुरेपणा लख्कन जाणवून देऊन, एका अननुभूत पातळीवर आपल्या व्यक्तिमत्त्वाला प्रक्षेपित करण्याची शक्ती अशा कवितांत असते. माणूस म्हणून अधिक पूर्ण बनण्याकडे अशा कविता आपल्याला घेऊन जात असतात. 'सलाम'मधली पाडगावकरांची कविता अशीच अस्वस्थ करणारी आणि आपल्या अनुभवकक्षेपेक्षा एक मोठा आवाका कवटाळीत आपल्याला वेगळ्या पातळीवर स्थिरावणारी कविता आहे.

खरे तर परीक्षणाला सुरुवात मुखपृष्ठापासूनच करायला हवी. वसंत सरवटे यांनी रेखाटलेले मुखपृष्ठ. वेगवेगळ्या आकारांतले, एकमेकांत गुंतणारे चेहरे. सगळे विकट हसणारे. भयानक नव्हे; पण भेसूर. कळाहीन. आणि हात. तसेच एकमेकांत गुंतलेले. अडकलेले, उगारलेले. या चेहऱ्या–हातांच्या गुंतवळ्यातून वाचलेल्या इवलशा पोकळीत पिसाच्या लेखणीची फेक करण्यासाठी नेम धरून सरसावलेली इवलीशी मूर्ती. संपूर्ण. कवीची. माणसाची. ...पाडगावकरांच्या कवितेचा आशय प्रतिकात्मकतेने प्रगट करणारे हे यथार्थ मुखपृष्ठ. फारसे सुखद नसलेले एकंदर पुस्तकाचे ले–आउट. (जाणीवपूर्वक तसे कॉंपोज केलेले?) 'आणीबाणीच्या अंधारात आत्मशक्तीची ज्योत जागी ठेवली' म्हणून दुर्गा भागवत यांस पाडगावकरांनी हे पुस्तक कृतज्ञतेने अर्पण केले आहे!

या पुस्तकातली पाडगावकरांची कविता अस्वस्थ करते ती अशासाठी, की सामान्य माणसाच्या सामान्यपणाची कुचेष्टा न करता, त्याच्या सामान्यपणाचे विदारकत्व या कवितेने, जखम उघडी करावी तसे उघड केलेले आहे. पराकाष्ठेची आपुलकी आणि पराकाष्ठेचा उपरोध यांचे एक विलक्षण मिश्रण कवीच्या भूमिकेमध्ये झालेले आहे. हे अनोखे आहे. इथे सामान्यांची दुःखे घडघडा सांगितलेली आहेत; परंतु त्यांचे हीन प्रदर्शन अथवा कांगावखोर समर्थन केलेले नाही. तिरस्काराची थुंकी न उडविता आणि उपदेशाचे सवंग प्रवचन न थाटता, चरचरणाऱ्या जखमेवरची पट्टी सोडण्याची ही भूमिका आहे. येथे क्रांतीचे स्वप्न आहे; परंतु त्याकरिता ढोलबडवे पुकार नाहीत. घडलेल्याच्या आणि घडणाऱ्याच्या करकरीत प्रतिक्रिया आहेत; परंतु प्रेषिताचा नाटकी अभिनिवेश नाही.

सामाजिकता आणि प्रचारकी प्रबोधनाचा अभिनिवेश यांची सोयिस्कर गल्लत मराठी वाङ्मयात आणि वाङ्मयीन समीक्षेत पुष्कळ वेळा केली गेलेली आहे. कवी हाही तुमच्या-आमच्यासारखा एक माणूस असतो. तुमच्या-आमच्यासारखे जीवन त्याच्याही वाट्याला येत असते. तोही एकाच समाजात बांधिलकीने जगत असतो. समाजातल्या बऱ्यावाइटाचे, अटळ मानापमानांचे, सामूहिक सुख-दुःखांचे अनुभव त्यालाही स्वीकारावे लागत असतात. या साऱ्याबद्दल चीड, संताप, उद्वेग, हताशपणा, आत्मशोध, आत्मपरीक्षण इत्यादी प्रतिक्रिया त्याच्याही मनात सहजपणे उद्भवत असतात. तथापि एक तर या साऱ्या अपरिहार्य प्रतिक्रियांची नोंद न घेता काव्यमयतेच्या आणि कविसुलभ स्वायत्ततेच्या नावाखाली स्वतःला एका खोट्या आत्ममश्गुल कोशात बंदिस्त करून घ्यावयाचे, अथवा बंडाचा झेंडा उभारून जिकडे तिकडे धामधूम उडवून देण्याची लोकनायकाची जबाबदारी अनाहूतपणे उचलून त्या जोखडाखाली उसन्या अवसानाची पावले दणादणा आपटायची, असे सोपे विभाजन बऱ्याच वेळा कवी, समीक्षक आणि वाचक यांच्या काव्यविषयक जाणिवेत झालेले असते. 'सलाम'मधली कविता यापेक्षा तिसराच मार्ग निवडते. हा मार्ग प्रामाणिक असल्यामुळे थेट मनापर्यंत येऊन भिडतो आणि अस्वस्थ करीत राहतो.

'लाथेच्या भयाने
डावा हात गांडीवर ठेवून
उजव्या हाताने सलाम' करणारा दुबळा,

स्वतःच्या दुबळेपणाची यथार्थ जाणीव असलेला, तरीही उघड्या डोळ्यांचा आणि करपत चाललेल्या संवेदनाशील मनाचा सामान्य माणूस इथे भेटतो. 'सलाम, भाई, सबको सलाम' या त्याच्या ठेक्यामागे किती तरी भावनांच्या प्रतिक्रिया कोंडलेल्या असतात. सामाजिक द्रष्टेपणापासून स्वतःच्या क्षुद्रतेच्या समंजस तिरस्कारापर्यंत सर्व.

सामान्यांच्या जीवनात भीतीची विविध रूपे वेगवेगळे आकार घेऊन सतत अवतरत असतात. दैनंदिन जीवनाच्या चाकोरीत मळलेली ही लहान-मोठी भीतीची रूपे त्याला 'भीतीच्या प्रत्येक ठेकेदाराला सलाम' करायला भाग पाडतात. स्वतःचा आणि भोवतालच्या जीवनाचा विदूषकी उपहास करीत, आपल्या आवाक्याबाहेरच्या जगाबद्दलचे चकित भांबावलेपण व्यक्त करीत करीत, कधी सहवेदनेचा, तर कधी अगणित अत्याचारांच्या सुजाण दहशतीचा अनुभव देत-घेत जेव्हा हा सलाम करू लागतो, तेव्हा परमपवित्र देशाच्या 'सुउदात्त सुमंगल सुपरंपरेला' केवढा तरी विडंबनाचा नेमका छेद, कसल्याही आक्रस्ताळ्या भाष्यवजा स्पष्टीकरणावाचून मिळत राहतो. क्रांतीच्या अनाठायी अभिनिवेशाचे वैयर्थ्य जाणवून देणारी मातीतल्या दुबळेपणाची हताश जाणीव आणि त्यातून आलेले स्वतःचा कडवट परंतु समंजस उपहास करण्याचे सामर्थ्य पाडगावकरांच्या या कवितेतून सातत्याने भेटत राहाते.

'सलाम' मधली ही कविता वशी थेट आतपर्यंत घुसत जाते. कवितेचे सामर्थ्य तिच्या सौंदर्यात असते, की तिचे सौंदर्य तिच्या सामर्थ्यात असते, यासारखे शब्दांच्या लटपटी करणारे प्रश्न या कवितेच्या निमित्ताने उभे करता येतील. किंवा कवितेच्या आविष्कारवादी आणि आशयवादी रसग्रहणांचे समोरासमोर द्वंद्वयुद्ध या कवितेच्या निमित्ताने घडवून आणता येईल. खरा प्रश्न ही कविता मनापुढे जागरूक प्रश्नचिन्हे उभी करते, हा आहे. ही प्रश्नचिन्हे सामाजिक, काव्यविषयक, सौंदर्यविषयक अशा वेगवेगळ्या मोहोरबंद पेटचांमध्ये वाटून टाकता येत नाहीत, हे आणखी एक वैशिष्टच.

उराशी सौंदर्यात्मक जाणिवेचा गहिरा सूर जपणारी कविता म्हणून आजवर पाडगावकरांची कविता प्रसिद्ध आहे. निसर्गातील विविध सौंदर्याचा आवाहक प्रत्यय घडविणारी, त्यातल्या अद्भुत सृजनशक्तीची उत्कट पूजा बांधणारी, हळव्या प्रीतीचा हळुवार आविष्कार घडविणारी, पार्थिवतेचे, सुंदर वासनेचे सामर्थ्य उघडचा डोळ्यांनी पाहून मुक्त कंठाने गाणारी ही कविता अशी रसिकांच्या मनातली या कवितेविषयीची प्रतिमा आहे; परंतु पाडगावकरांच्या मनात दडून बसलेल्या जिप्सीने या प्रतिमेचे रूप 'सलाम' मध्ये पार विसकटून, उधळून टाकले आहे. अर्थात याचा अर्थ, हळुवार संवेदनांचे तरल सौंदर्य जपण्याची तिची क्षमता कमी झालेली आहे, असा नाही.

" प्रत्येक नव्या स्वरासाठी नव्याने
जन्मणारी बोटे. गुलाबाच्या कळीतून
पाकळ्यांसारखी उमलणारी बोटे.
स्वरांनी गहिवरलेली बोटे.
आत्मा असलेली बोटे. . . .
ऐकता ऐकता क्षणभर तो एकटा झाला
रानातल्या चांदण्यांसारखा. . . . "

हे सतारीच्या मैफलीतल्या अनुभवाचे वर्णन ह्याच उत्कटतेचा गहिरा सूर हळुवारपणे जपणारे आहे; पण त्याचबरोबर नव्या वास्तवाचे रोखठोक भानही या कवितेला आता अधिक डोळसपणाने आणि अधिक दाहकतेने आलेले आहे किंबहुना या रोकठोकपणावरच आता तिचे केंद्र स्थिर होऊ पाहात आहे. 'मैफल' सारखी, दोन वेगळ्या लेव्हलस्वर एकाच वेळी सारख्याच सामर्थ्याने उमलणारी आणि पुन्हा अनुभवाकडे दुरून पाहणारी, एकाच वेळी अलिप्त आणि बुडालेली कविता याचे उत्कृष्ट उदाहरण ठरावे.

नव्या वास्तवाचे रोखठोक भान उचकटणारे पाडगावकरांचे कविमन आपल्या अनुभवाच्या आकृती मांडू लागले, म्हणजे त्यातून विलक्षण प्रत्ययकारी आकृतिबंध निर्माण होतात.

" सावधान. खाली मान.
बंद डोळे. बंद कान. " यासारखी सन्नाटा अनुभवणारी अगतिकतेची आवर्तने त्यातून घुमताना आढळतात.

" मला खूप भीती वाटते.
तुला खूप भीती वाटते.
त्याला खूप भीती वाटते.
तिला खूप भीती वाटते.
भीती जरा थांबण्यासाठी
केमिस्टकडे गोळ्या असतात. "यासारख्या शब्दावर्तनातून अनामिक परंतु निरर्थक भीतीची केविलवाणी दडपणे नेमकेपणाने व्यक्त होताना जाणवतात. काळोखाच्या रांगेमध्ये निमूटपणे उभे राहताना "ही रांग कुठे जाते?' हा मनात भीत भीत रेंगाळणारा चुटपुटता प्रश्न हलकेच उभा करून जाणिवेचे पुसट दर्शन आणि बंधनांचे कठोर दडपण, यांचा एकाच वेळी प्रत्यय कधी पाडगावकर घडवितात. तर कधी 'यशस्वी तुप्पाळ थुलथुलित' कवीच्या अवस्थेचे मर्ढेकरी सिनिकपणाने चित्र रेखाटून एक वेगळ्या पातळीवरचे सेल्फ क्रिटिसिझम ते समोर फेकतात.

'घाणीहून घाण आणि गंगेहून स्वच्छ.
घाणीत असून घाणीच्या पार असलेले.'
गटारनाल्यात न्हाणारे नागवे निष्पाप पोर पाहून

'मी रस्त्याने जाताना बघतो सांस्कृतिक शहारून
तेव्हा माझ्या मनगटावरल्या शॉकप्रुफ घड्याळात
असतात वाजलेले पावणेआठ.
समस्त मानवांच्या घड्याळांत पावणेआठ'

असे आपल्या अनुभवाचे खपली काढणारे दर्शन ते घडवितात आणि लब्धप्रतिष्ठितांच्या कोमट कातडीबचाऊ सहानुभूतीचा सडका पू भळभळ वाहू लागतो. 'सांस्कृतिक शहारणे,' 'शॉकप्रूफ घड्याळ,' 'पावणेआठ' या प्रतिमा काटेरी चाबकाप्रमाणे आपल्या मनाला रक्तबंबाळ करून जातात.

'तत्त्वज्ञानाची काव (काव) फासलेल्या शब्दांच्या कसरती, 'तर्काच्या अंगणावर लाथ मारणारा आत्मा,' 'हातभट्टीवाल्यांचे गणवेषधारी आश्रित,' 'सुखाचा डायरिया झालेल्या तुंदिल स्त्रिया,' 'रित्या भयभीतांचे भक्तिधुंद तांडे'... असल्या प्रतिमांतून अतिशय परिणामकारकतेने वेगवेगळ्या सामाजिक अनुभवांचा पाडगावकर छेद घेतात, तेव्हा किती तरी वेगवेगळ्या प्रतिक्रिया आणि भाष्ये यांची वादळे त्या प्रतिमांमध्ये सामावलेली असतात. काही अनुभवांची परिवेदने कवी कल्पनाचित्रांच्या कथनमालिकेतून अशा प्रभावीपणे मांडतो की, त्या कल्पनाचित्रांतून अनेकविध संदर्भ ताजे होऊन सामोरे येतात. पुन्हा या कल्पनाचित्रांचे ताणतणाव विविध पातळ्यांवरचे असतात. 'गळ्यात घातलेल्या हारांतील खरी फुले देखील क्षणभर शरमेने कागदाची सुशोभित होतात.'... 'दैनिकाच्या दीड कॉलमाची धाव असणारा सरडा सरावाने गरुडांच्या उड्डाणावर थुंकू लागतो'... 'राजरस्त्यांवर कोल्ह्यांचा महापूर येतो'... 'एका प्रचंड टोपलीत हिप्नॉटिस्ट सर्वांचे चेहरे गोळा करतात.'... 'सापांशी संगनमत करणारे धूर्त गरुड चिमण्यांचे चवीने बळी घेतात.'... 'उंची लांडग्यांची फौज घोषणा घोषित जाते'... ही असली काही कल्पनाचित्रे. जी. ए. कुलकर्णींच्या कथांतील प्रतिमासृष्टीप्रमाणे ही कल्पनाचित्रे काही विलक्षण सत्याच्या शोधासाठी मनाला सक्तीने प्रवास करायला लावतात.

राजकीय पुढाऱ्यांचा निर्लज्ज संधिसाधूपणा, सांस्कृतिक कमिट्यांच्या सभासदांची निरर्थक शोभास्थाने, जीवनाच्या प्रवाहात अपरिहार्यपणे सतत (मनाविरुद्ध) वाहात जाणारा सामान्य माणूस, त्याचे निर्बुद्ध परंतु उत्कट सामूहिक राग-लोभ, महात्म्यांच्या स्वप्नांचा सामान्यांनी केलेला विध्वंस, तथाकथित विद्वानांची लाचारी असे विविध विषय पाडगावकरांच्या 'सलाम' मधील अनुभवांचा 'विषय' झालेले आहेत. या सगळ्यातून, हरपलेल्या आत्म्याची आणि

दुभंगलेल्या व्यक्तित्वाची वेदना त्यांनी व्यक्त केलेली आहे. व्यक्तिचित्रांच्या मांडणीतूनही (उदा० 'राघोबा रघुनाथ,' 'पुरुषसिंह,' 'साहेब,' 'म्हातारी,' 'श्वापद') तीच सनातन खंत धारदारपणे प्रगट झालेली आहे, पण त्यातच कुठेशी सामान्यांच्या सामान्यपणाशी समजदार जवळीक साधणारी सहवेदनाही भरून राहिलेली आहे. कधी सिनिक ॲप्रोच स्वीकारीत ('स्तनाळ नटी मजा आणते पडद्यावर : त्यानंतर घरी बायकोही बरी वाटते.') तर कधी हळवेपणाने जीवनाची खूण जपत सामान्यांच्या सामान्यपणातच माणूसपणाचे पुरावे पाडगावकर शोधीत राहतात.

'पोपट' सारखी एखादी कविता विनाकारण स्पष्टीकरणात रेंगाळतेही, नाही असे नाही. पण

'मग आणखी चार पावले टाकतो हा पुरुषसिंह

हायड्रोसिल झाल्यागत भासणाऱ्या प्रगत डौलाने'

यासारखी झगझगीत प्रकाशझोताने चमकणारी कडवट उपरोधात्मक कविता, भव्यतेचे उत्कट परंतु भाबडे नसलेले स्वप्न शोधणारी 'सूर्ययात्रा' सारखी कविता, प्रातिनिधिक असूनही वैशिष्टचपूर्ण असणारी आणि भाष्य नसूनही भाष्य करणारी बाणासारख्या रुतणाऱ्या जीवनस्पर्शाची 'साहेब' सारखी व्यक्तिचित्रात्मक कविता, आदर्शाचे भान आणि वास्तवाची जाण यांचा एकाच वेळी प्रत्यय घडविणारी 'गांधी जयंती' सारखी कविता, या खऱ्या 'सलाम' मधल्या पाडगावकरांच्या कविता आहेत.

असल्या (आणि असल्याच) कविता पाडगावकरांनी का लिहिल्या? 'उत्तर' या कवितेत या प्रश्नाचे उत्तर, म्हणजेच या वेगळ्या स्तरावरच्या कवितांचे आत्मनिष्ठ नि आत्मव्याप्त प्रयोजन प्रगट झालेले आहे; पण इतरत्रही त्याच्या खुणा इतस्ततः विखुरलेल्या आहेत. उदाहरणार्थ, महात्मा गांधींचे नाव उच्चारताना काळोखाच्या बंदिशाळेतून एक राष्ट्र बाहेर मोकळ्या प्रकाशात येताना कवीला दिसते; पण त्याचबरोबर शब्दांच्या बाजारपेठेत अर्थाचे लिलाव मांडणारे आपल्यासकट सारे घोषणांचे कंत्राटदार त्याला प्रकर्षाने खुपतात आणि

'मी आज चाचपडताना इथल्या कुबट अंधारात.

दचकलो हातावर भास होऊन तुमच्या तप्त अश्रूंचा,'

अशा विलक्षण आत्मप्रत्ययाचा केवढा उंच झोका त्याचे मन अनुभवते.

'चौतीस वर्षे पडले नव्हते माझेही दुधाचे दात,

नव्हती एकही अक्कलदाढ माझ्याही भाबड्या जबड्यात.'

असे रोकडे आत्मनिष्ठ अंतर्मुख सत्य त्याला दैवतांच्या निरर्थकपणातून प्रखरपणे ध्यानात येते. या असल्या आत्मदर्शनाने आणि आत्मानुभूतीने तो अस्वस्थ होतो आणि मग कधी

'मला दिसतात तुमच्यावर डोळे रोखून बसलेले

डोंगरापल्याड टपलेल्या गिधाडांचे उपाशी थवे.'

असा टोकदार भेदक इशारा तो भोवतालच्यांना देतो, तर कधी

'हे ओझे नाकारू नका :
फुलांइतकेच सूर्याइतकेच
हे ओझेही खरे आहे.
जो काळोखापासून पळतो
त्याच्यासाठी सूर्य नसतो.
जो मृत्यूला भितो
त्याच्यासाठी फुले उमलत नाहीत.
काळोखाचे थैमान घालीत हा वारसा येईल
तेव्हा सूर्य घेऊन त्याला सामोरे जा.'

असे कळवळ्याचे आवाहन तो उद्याच्या जीवनप्रवाशांना करताना दिसतो. या सगळ्या सामाजिक अनुभूतींशी त्याचे खरेखुरे, अंतर्गामी, रक्ताचे नाते असते. अटळपणाने आत फुटत–उसकटत राहणारे.

'एक सांस्कृतिक बडबडगीत' (त्याच्या या मथळ्यातच त्याचे सारे वैशिष्ट्य स्पष्ट व्हावे!),

'भिंतीवर चिकटविलेल्या चित्रांवरून तुमच्या

कोसळेल नेमेचि येणारा बिलंदर पाऊस.'

यासारखी हताश जाणीव,

'कुंपणावर बसून
आपली पार्श्वभूमीही नाही चाचपता येत
कारण त्या वेळी दोन्ही हात
गुंतलेले असतात तोल सावरण्यात.'

यासारख्या भेदक बोचरेपणा कलाबतून चमचमणारे गलेलठ्ठ हार घेऊन मागे धावणाऱ्यांपासून जिवाच्या कराराने धूम पळत सुटण्यातली सकारण भीती,

'मेलेल्या भुंग्यांसारखी गोळा करतो मी अक्षरे

माझ्या निश्चेष्ट डोळ्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी.'

असे सुन्न करणारे हृदय दुःख, 'कोंबड्या' कवितेतल्यासारखी संभावितपणाचा शेंदूर खरवडून आतल्या हिडिस असत्याला डोळे भिडविण्याची हिंमत, नियतीच्या अपरिहार्य क्रौर्याचे प्रतीकात्म दर्शन घडवून माणसाच्या अगतिकतेचा घेतलेला ('श्वापद'), कधी आउटसाइडच्या वृत्तीचा स्पर्श अशा विविध रूपांनी पाडगावकरांची 'सटायर' या कवितांतून प्रगट झालेली आहे. त्यामुळे या कवितांमागची कविवृत्ती एकच असली, तरी त्यांतून आकार घेणाऱ्या अनुभूतिचित्रांना एकसुरीपणा न येता, नित्य नव्या भावसत्याचे दर्शन घेण्याचे व घडविण्याचे सामर्थ्य प्राप्त झालेले आहे.

'सत्य शोधणाऱ्याच्या भाळी असतो लिहिलेला

आपली विच्छिन्न स्वप्ने घेऊन चालण्याचा ललाटलेख;

भर दुपारी असह्य तापलेल्या निर्जन रस्त्यावरून

त्याचे प्रेम हिंडत असते अनवाणी पायांनी.'

असा धगधगीत अर्थांतरन्यास त्यातून कधी हाती गवसतो, तर कधी

'डांबरट रस्त्यावर लोखंडी धमक्या खणाणल्या,

पडेल खांद्यांच्या झाडांनी नेसणे सावरली,

फेकले गेले घोषणांचे पेटवले बोळे :

गवतभरली माणसे धगीनेच थरथरली.'

असा विलक्षण नाट्यमय प्रसंग प्रतिमांच्या भाषेत जिवंत बनून सामोरा येतो. अटळ वेदना आणि चेहऱ्यांचे मुखवटे, वेडगाणे गाणारी स्वप्ने आणि आयुष्याचा उभा बाजार, चिखलाचे पाय आणि संस्कृतीचे नटवे दिवाणखाने, जखमांची किंमत आणि

फेसाळलेला जल्लोष अशा विरोधी अनुभवांच्या लयीची दुपेडी गुंफण एखाद्या सिद्धांतानुभवाच्या अटळ घाटदार शिखराकडे कधी घेऊन जाते, तर कधी वास्तवाच्या भीषणतेला डोळा भिडवूनही

'हात उगवतील :
कसे कळत नाही
पण उगवतील.'

असा उदंड विश्वास समर्थपणे ठसठशीत बनून पुढे येतो. 'भिंत'सारख्या कवितेत शब्दांशी क्रीडा करीत सहचारी भावनांचे आकार गुंफलेले दिसले, तरी तेथेंही हा धागा हरवीत नाहीच.

'अशी माझी कविता साधेपणा जपते
आणि वाचूनही किती लवकर संपते.'

असे स्वत: पाडगावकर भले खुशाल म्हणोत त्रेसष्ट पानांत बांधलेल्या या कवितेचे शब्द वाचून लवकर संपले, तरी मनातल्या विचारांची आणि प्रतिक्रियांची वादळे संपत नाहीत. खरे तर तिथून ती सुरू होतात.

या कवितांना कविता म्हणता येईल का, ही सुंदर कविता आहे का, ही श्रेष्ठ कविता आहे का, यातले भाषेचे आणि प्रतिमांचे नवे प्रयोग कोणते इत्यादी प्रश्नांच्या जंगलात न शिरता, एवढे म्हणावेच लागेल की ही अस्वस्थ करणारी कविता आहे. मनाच्या विचारांचा प्रवास सुरू करणारी कविता आहे. अनुभव देणारी कविता आहे आणि कवीला एवढे पुरे असते, नाही का ?

सलाम
मंगेश पाडगावकर
मौज प्रकाशन, मुंबई
किंमत : १०, रुपये.

## गुन्हेगारां इथे न थारा
### माहितीपर पोलिसी कादंबरी

पोलिसखातं हे जनसामान्यांच्या दृष्टीतून वेगळंच दिसतं. तिथला 'पोलिसी खाक्या', नियमांचं पालन, नियम तयार करणारेच भंग करतात. मोठं थ्रिल, गमतीदार अनुभव वगैरेचं महत्त्व फारच. पोलिसी जीवनक्रमात येणारे विविध रोमांचकारी अनुभव असणारी 'गुन्हेगारां इथे न थारा' ही पोलिस-कादंबरी वाचनात आली. महाराष्ट्राचे पोलीस महानिरीक्षक (आय. जी. पी.) श्री. ई. एस. मोडक यांच्या 'No place for crime' या मूळ इंग्रजी कादंबरीचा श्री. ग. रा. टिकेकर यांनी केलेला हा मराठी अनुवाद.

पोलीस विभाग म्हटल्यावर रोमांचकारी अनुभव, त्याच्या जोडीला पोलिसी पद्धती, गुन्ह्यांचा तपास आदि गोष्टींची आवश्यकताच. त्यातून 'कादंबरी' म्हटल्यावर नुसते गुन्हे रोमांचकारी वगैरे असून चालत नाही, तर रोमांचाबरोबर रोमान्सही असावा लागतो. त्यातही बारीकसं उपकथानक घुसवून कादंबरीचं 'कादंबरीपण' टिकविण्याची व्यर्थ धडपडही करावी लागते. या धडपडीत श्री. मोडक यशस्वी झाले आहेत; पण या यशस्वितेमागील बरीच कारणे शोधून काढणे आवश्यक वाटते.

'गुन्हेगारा इथे न थारा' (नाव सुद्धा 'र'ला 'र' करून तयार केल्याचं वाटतं.) ही एक निवेदनपर कादंबरी आहे. (informative novel). हे निवेदन करणारा जो निवेदक आहे तो तर पोलिसमधलाच आहे. त्यामुळे त्या निवेदकाला स्वत:ला असलेली सर्व प्रकारची माहिती तो वाचकाच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न करतो ! कधी कधी ही माहिती कृत्रिम अशा संभाषणांमधून येते. उदा. प्रा. देशमुख 'भारतीय पोलिस संघटनेचा इतिहास' या विषयावर माहिती देत होते .... (पृष्ठ ३०) यानंतरची चारही पाने या इतिहासापायी खर्ची पडतात. त्यातून मिळते काय ? तर काही थोडी-फार माहिती की ज्याच्यासाठी वाचक हे पुस्तक हाती धरीत नसतो. बरं, या अशा प्रकारांचा कादंबरीच्या मूळ कथानकाशी आणि फॉर्मशी देखील संबंध दिसून येत नाही. उलट ती रसनिष्पत्तीत अडचणच होतात. अशी उदाहरणे कित्येक देता येतील. कादंबरीचा नायक कुमार याला एक मोटार घ्यायची असते. या एवढ्यासाठी लेखकाने बरेच व्याप सहन करून ती मोटार हवी तेवढ्या किमतीत कुमारच्या हाती देऊन टाकली. अखेर अशा प्रकारच्या माहितीचा कथानकाशी संबंध काय ?

कादंबरीचा नायक कुमार (अरविंदकुमार महाजन) याच्या जीवनातील पोलिसी संघर्ष, वैयक्तिक संघर्ष, त्याला येणारे निरनिराळे अनुभव हा या कादंबरीचा केंद्र विषय. असं जरी असलं तरी कुमारव्यतिरिक्त इतर बऱ्याच व्यक्ती अगदी तपशीलवार येऊन जातात. कुमारला पोलिस ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळतो. तो नाशिकला प्रयाण करतो. तिथं तो खूप दिवस पोलिस ट्रेनिंग घेतो म्हणे ! या एवढ्या दिवसांतील कुमारचे फार थोडे अनुभव या पहिल्या प्रकरणात आले आहेत.

नाशिकच्या ट्रेनिंगनंतर कुमार पोलिस-अधिकारी म्हणून साताऱ्याला हजर होतो. तेथील खून, म्हातारबाबाचं खून सत्र आदींचा शोध कुमार तडफेनं घेतो– यशस्वी होतो– तिथून परत नाशिकला, तिथून मुंबईला– अशा प्रवासात कुमारला येणारे निरनिराळे अनुभव तपशिलाने मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

कादंबरीचा काल हा स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्वातंत्र्यानंतरच्या काही वर्षांचा आहे. त्यामुळे ब्रिटिश अमदानीत होणारी कुमारची कुचंबणा, खुनी-दरोडेखोर यांच्याशी, पत्री सरकारसारख्या संघटनांशी त्याला करावा लागलेला संघर्ष, वैयक्तिक जीवनातील सुख-दु:ख, धावपळ, बौद्धिक कसरती या साऱ्यांचंच वर्णन लेखकानं या कादंबरीत केलं आहे.

कुमारच्या पोलिसी व्यवसायातील घडामोडींबरोबरच (तो उत्कृष्ट वाक्पटू वगैरे असल्याने) त्याचं एक प्रेम-प्रकरणही कादंबरीचं कादंबरीपण टिकवून धरते. शेफाली नावाची युवती. दोघांचं प्रेम, शेफालीच्या माता-पित्यांचा विरोध, पळून जाऊन लग्न, सुखाचा संसार, या मानसिक धक्क्याने शेफालीचे वडील गतप्राण होतात.

हे उपकथानकही कादंबरीचा बराच भाग व्यापतं. कुमार जेव्हा मुंबईला येतो तेव्हाही तेथील कामिनी दीवान नामे नटीवर त्याचं प्रेम वगैरे बसतं. संस्कृती वगैरेंची आठवणही त्याला अधूनमधून येत असते; पण शेफाली त्याला क्षमा करते. असेही प्रसंग कादंबरीच्या शेवटच्या भागात आले आहेत.

पहिले तीनही भाग पोलिसी कारभारावर प्रकाश पाडणारे असल्यामुळे (बहुतेक) शेवटच्या भागात ही कादंबरी कौटुंबिक

जिव्हाळयाकडे वळते.

एकंदर कादंबरी वाचल्यानंतर एक तर असं वाटतं की, त्यातील इन्फरमेटिव्ह भाग काढून टाकला असता तर बरं झालं असतं. त्यामुळं होतं काय की, कुमार महाजन ही व्यक्तिरेखाही आपलं सम्यक् दर्शन देऊ शकत नाही. ती व्यक्तिरेखा संपूर्णपणे वाचकासमोर उभी राहातच नाही, उलट कादंबरीतली इतर पात्रे मात्र आपला प्रभाव पाडून जातात.

लेखकाने निवेदनात म्हटल्याप्रमाणे ही कादंबरी वाचकांना तीन पातळींवर वाचता येईल. पोलिसांना गुन्ह्याचा तपास व गुन्हेगारांचा शोध करताना करावे लागणारे प्रयास, गुन्ह्यांची कथा आणि पोलिसांच्या कार्यात व्यवहारात किती अडचणी येतात, या अडचणींवर मात करताना प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते त्याचं चित्रण आणि तिसरी पातळी म्हणजे यातील तरुण कथानायक संकटे व मोह यावर मात करून स्वत:चे जीवन विकसित करण्याची व आपल्या अस्मितेची ओळख करून घेण्याची जी पराकाष्ठा करतो ती... एक प्रकारे ही त्याची जीवनगाथाच !

लेखकाने ही आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे, हे निवेदनात न कळत कबूल करून टाकलेले आहे. तरीही कादंबरीतील 'कुमार' हा पूर्णपणे विकसित वाटत नाही. कुमारच्या आई-वडिलांचा उल्लेख एकदा पहिल्या दोन-तीन पानांत येतो. पुढे कुमार एके कुमार !

इंग्रजीचा अनुवाद केला आहे श्री. ग. रा. टिकेकर यांनी ! भाषा साधी आणि सोपीच वापरलेली असली तरीही काही ठिकाणी तिला कृत्रिमतेचा आणि अनुवादाचा म्हणून एक वास आहे.

'गुन्हेगारां इथे न थारा' मध्ये पोलिसी जीवनाची माहिती मिळते; पण केवळ माहिती मिळविणे एवढयाच उद्देशाने ही कादंबरी वाचली तर ठीक, नाही तर कथानक' प्रधान, रंजक वगैरे कादंबरीची (तद्दन) मूल्ये लावून ही कादंबरी तुम्ही जर वाचाल तर फसाल !

अशा निवेदनपर कादंबरीचा प्रकार मराठीत अजून रूढ झालेला नाही. हाही एक नवा बाज आहे. त्यात थोडेफार बदल अत्यावश्यक आहेत. ते केल्यास ही कादंबरी अधिक वाचनीय, मननीय, चिंतनीय ठरेल.

—मुकुंद संगोराम

गुन्हेगारां इथे न थारा !

लेखक : ई एस्. मोडक

अनुवाद : ग. रा. टिकेकर

प्रकाशक : प्रेस्टीज पब्लिकेशन्स

मूल्य : २०/- रुपये.


शुक्रवार ता. ४ ऑगस्टपासून सुरू

**मिनर्व्हा** पुणे **वैभव** (हडपसर)
**अरुण** (दापोडी) **अशोक** (पिंपरी)
**हेमलता** (नासिक) **न्यू चित्रा** (वाई)
**सरस्वती** (सांगली) **अनुराधा** (नासिक रोड)
येथे


जुलूम, जबरदस्ती, अडवणूक, पिळवणूक, बलात्कार, अत्याचार करणाऱ्या गावातील चार माजलेल्या गुंडांची अंगाचा तिळपापड करणारी अमंगल कथा

**निर्माते—कै. गंगाराम मातफोड, प्रकाश केदारी**
**कथा, पटकथा, संवाद—शंकर पाटील**

भू.—**उषा चव्हाण, यशवंत दत्त** आणि निळू फुले
शिवाय—उषा नाईक, राघवेंद्र कडकोळ, मोहन कोठीवान, विलास रकटे, शोभा सासने, माया जाधव, सुहास भालेकर, लीला गांधी व राम नगरकर.

(कल्याण चित्र प्रकाशन)

**लौकरच येणार — प्रभात (सातारा) नील कमल (लोणावळा) नामवैभव (फलटण) सुदेश (कोपरगाव) लक्ष्मी (श्रीरामपूर)**



सिद्धिविनायक चित्र

# चंडाळचौकडी

• दिग्दर्शक प्रभाकर नायक • संगीत राम कदम •



हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# पारध

शिवशक्ती प्रॉडक्शनतर्फे निर्माता-दिग्दर्शक किशोर मिस्कीन यांचा 'पारध' पुण्यात प्रदर्शित झाला.

किशोर मिस्कीन यांनीच दिलेल्या मुलाखतीप्रमाणे या चित्रपटात व्यावसायिक गोष्टी त्यांनी घातलेल्या आहेतच; पण अत्यंत चमकदार रहस्य (इंटेलिजंट सस्पेन्स) या चित्रपटाद्वारे त्यांनी दिलेले आहे, असा त्यांचा दावा.

रहस्यकथा हा प्रकार माझ्या मते अत्यंत नाजूक आणि गुंतागुंतीचा असतो. एखाद्या कोळ्याच्या जाळ्यासारखा. प्रत्येक रहस्यमय (अर्थातच तथाकथित रहस्यमय) चित्रपटात कोळ्याचे जाळे दाखविलेले असतेच; पण प्रत्यक्ष कथेत मात्र त्या जाळ्याची ती वीण, क्लिष्टता किंवा गुंता आणि तरीही असलेला प्रत्येक धाग्याचा वेगळेपणा, त्या धाग्यांचा परस्परांशी जडलेला संबंध, त्या जाळ्याचा आधार, त्या आधाराने दुवे जोडून संपूर्ण जाळ्याचा घेतलेला शोध इत्यादी वैशिष्ट्ये अगदी क्वचित दिसतात. बहुतेक ठिकाणी रहस्याची उलगड न होता फोड होते. म्हणजे तीन तासांपैकी दोन तास सत्तावन्न मिनिटे प्रेक्षकाला भलत्या-सलत्या गोष्टींमध्ये घुमवीत, गुंगवीत ठेवून नंतर एखाद्या निष्पाप, निरपराध (वाटणाऱ्या) गोष्टीचा तिरपगडा संबंध जोडून सर्व रहस्याची तिच्या माथ्यावर शेवटच्या तीन मिनिटांत फोड करून प्रेक्षकाला धक्काबुक्की करण्याचा प्रकार असल्या रहस्यमय चित्रपटांमध्ये फार असतो.

'पारध' ही याला अपवाद नाही. खरे सांगायचे तर तो रहस्यमय चित्रपट वगैरे नाहीच. तर पहिली साडेपंधरा मिनिटे भय, नंतर पावणेदीड मिनिटे करुण, मग सव्वादहा मिनिटे शृंगार, मग साडेअडीच मिनिट वात्सल्य असले जुनाट, रटाळ, भिकार तुकडे एकापुढे एक जोडलेली सुतळी आहे. कथा-पटकथा मधुसूदन कालेलकरांची म्हटल्यावर अर्थात हे अपेक्षित होतेच.

एका स्त्रीच्या—विद्याच्या—जीवनात सतत रखरखलेले ऊन आणि आपल्या मुलाच्या खुनाचा व मुलीच्या आत्महत्येचा तिने घेतलेला सूड हा चित्रपटाचा मुख्य विषय. त्यापैकी खून, आत्महत्या, सूड हे प्रकरण शेवटच्या आठ मिनिटांमध्ये उरकले जाते, तर त्या रखरखत्या जीवनावर सतत नाच, गाणी, विनोद असे गुलाबपाणी शिंपले जात असताना त्याचा चटका कुठे जाणवतच नाही. याशिवाय चोरी, स्मगलिंग, मोटारीतून पाठलाग वगैरे लाख भानगडींच्या गोंधळात वर सांगितलेला मुख्य विषय कुठच्या कुठे हरवून जातो.

दिग्दर्शक किशोर मिस्कीन यांच्या कामाबद्दल अधिक काय लिहिणार? वादळी रात्र, निर्जन वाडा, अचानक ऐकू येणारे गाणे, गोळीचा आवाज वगैरे गोष्टींमधून बऱ्यापैकी जमत असणारे वातावरण त्यांनी भराभर एकेका प्रसंगाच्या फुंकरीने उधळून लावले आहे. भुताची कल्पना खरोखरीचे भूत म्हणा वा अतृप्त, भटकता आत्मा म्हणा पण प्रत्यक्षात दाखविणे एवढेच थोडेसे वेगळेपण. ('ये ना सजली, स्वप्ने नयनी' हे गीत सीमाचा-विद्याची सून-अतृप्त आत्मा गातो.) बाकी चित्रपटांतून भुताने केलेल्या चमत्कारांना नंतर काही तरी तांत्रिक कारणांचा आधार दिलेला असतो. बाकी दिग्दर्शनात इतका ढोबळपणा आहे. १) कथेची गाडी पुढे ढकलण्यासाठी मारलेला फ्लॅश बॅकचा धक्का. २) 'ये ना सजली स्वप्ने नयनी' या सूत्रगीताचा वापर. ३) विद्याला घडणारे मुलगा आणि सून यांचे आकाशमीलनदर्शन अशी कित्येक उदाहरणे देता येतील. हाच प्रकार दिग्दर्शनातील दुर्लक्षाबद्दल. १) प्रारंभी शेठ दीनानाथच्या चेहऱ्यावर हलत्या कंदिलामुळे प्रकाश-अंधार-प्रकाश-अंधार पडतो, पण कंदिलाच्या हालचालींचा आणि त्या प्रकाश व अंधाराचा नीट ताळमेळच बसलेला नाही. २) विद्या देवळात घंटा वाजविते आणि नंतर ती घंटा हलत राहते. त्या घंटेतील लोलक हलत नसतो; पण घंटेचा घणघणाट मात्र कानाच्या पडद्याची ऐरण करीत असतो. ३) सीमाच्या 'आता हसतोस कशाला?' या प्रश्नानंतर सुनीलच्या अचानक लक्षात येते, 'अरे, आपल्याला हसायचे होते नाही का?' आणि मग 'हा हा हा हा' ४) मागे सांगितलेल्या अनावश्यक गोष्टींचे कथेवरील आक्रमणही दिग्दर्शकानेच होऊ दिलेले आणि स्वमुखे मान्य केलेले. ५) चित्राच्या श्रेयनामावलीत असंख्य चुका. ही नावे तरी एखाद्या जाणत्या माणसाकडून तपासून घेत जावे, अशी विनम्र सूचना.

बहुतारांकितता हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य जाहिरातीत पुनःपुन्हा बिंबविले जाते. विशेषतः नूतन, सचिन व सारिका हे हिंदी आकाशातील तारे मराठी आकाशात आल्याबरोबर त्यांना वेगळेच तेज चढल्याचे सांगितले जाते. यापैकी नूतनची किंचित हिंदीकडे झुकणारी संवादफेक सोडल्यास तिने नववधू, विद्या वत्सल आई आणि करारी व सूडाने पेटलेली विधवा बरी उभी केली आहे. एक वयाचा मुद्दा सोडल्यास मिस्कीनसाहेबांची ही निवड योग्य. आणखी एक योग्य निवड डॉ. श्रीराम लागूंची. प्रारंभीच्या भेदरलेल्या दीनानाथापासून शेवटच्या अगतिक, मरणसंमुख दीनानाथपर्यंत मधले सगळे रंग डॉक्टरसाहेबांनी भन्नाट दाखविले आहेत. त्यामुळेच तुरळक भेटणारे त्यांचे व नूतनचे प्रसंग खूपच रंगले आणि ओॲसिससारखे वाटले. बाकी सगळ्यांना अनुल्लेखानेच मारणे योग्य. सारिका व नूतन यांच्या बोलण्याची शैली हिंदीच्या प्रभावाखालील होतीच. शिवाय विशेषतः करुण, भावनेने ओथंबलेले, चिंबलेले, तिंबलेले प्रसंग दोघींतीही कृत्रिम बनविले आहेत. कदाचित हा कालेलकरांच्या संवादांचा परिणाम असेल. कथा-पटकथा पूर्ण बिघडविल्याने समाधान न झाल्याने की काय कालेलकरांनी संवादक्षेत्रही आपल्या अधिकारकक्षेत घेतले. बहुतेक सवाद 'तुमच्या दर्शनाने माझा ऊर भरून येतो.' 'अरेरे, दोन कोवळ्या फुलांचा एका गिधाडाने केलेला काय हा निर्घृण अंत!' अशा धाटणीचे.

'पारध'चे संगीतकार आहेत राम कदम. एकमेव चांगले गीत म्हणजे सुमन कल्याणपूरने म्हटलेले 'ये ना सजली.' बाकीच्या तीन गाण्यांमध्ये एक स्वतः नूतनने म्हटले आहे, —'मी तीच परंतु ती नव्हे.' पुष्पा पागधरेच्या अगोड, किरट्या आवाजातील, उंच पट्टीतील 'बाण सुटला, नजरबाण सुटला' ऐकणे तर केवळ शिक्षा आहे— ऐकणे आणि पाहणेही.

छायाचित्रकार आहेत किशोर दवे. प्रकाशयोजना (कंदील) आणि ध्वनियोजना (घंटा) कशा पायात पाय अडकून कोसळत होत्या हे मघा सांगितलेच. चित्रपटात फिल्टरचा बदल नीट न केल्याने क्षणात निळी पात्रे पिवळी पडणे असे गंमतीदार प्रकार वारवार घडत होते.

थोडक्यात कोणत्याही हिंदी चित्रपटाचे मराठीकरण करून प्रेक्षकांची पारध कशी व किती सहज करता येते, हे किशोररावसाहेबजी मिस्किन यांनी पुन्हा एकदा दाखवून देण्याचे योजले आहे. ☐

## राजधानी दिल्ली : पृष्ठ ४ वरून

वागलो तरी, भारतीय लोकदलातील आपले स्थान लक्षात घेऊन, मोरारजीभाई आपल्याला मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची हिंमत दाखविणार नाहीत हा कयास खोटा ठरल्यानंतर माघार घेण्यावाचून त्यांना पर्यायच उरलेला नव्हता.मात्र तसे करताना आपल्याला कमीत कमी मानहानी सहन करावी लागावी यासाठी त्यांची धडपड सुरू झालेली आहे. पत्रे आणि पत्रक मागे घेण्याची तयारी दर्शविली की कार्यभाग होईल असे त्यांना वाटत होते; परंतु तेवढ्यावर मोरारजी-भाईंचे समाधान होणार नाही, हे त्यांना दुसऱ्या भेटीनंतर कळून आलेले आहे. म्हणून यापुढील भेटीच्या वेळी चरणसिंगांना आणखी एक पायरी खाली उतरून आपण त्या पत्रात केलेली विधानेही मागे घेत आहोत असे जाहीर करावे लागेल. तसे करायला त्यांना भाग पाडण्याचे कौशल्य पटनाईक आणि लिमये हे मध्यस्थ किती लवकर दाखवितात यावरच गेले दोन महिने जनता पक्षाला भेडसावीत असलेल्या पेचप्रसंगांची सोडवणूक अवलंबून राहणार आहे.

आपल्या वैयक्तिक रागा-लोभापायी आपण विरोधी पक्षांना सरकारविरोधी प्रचाराचे एक साधन मिळवून देत आहोत याचे चरणसिंगांना भान राहिले नव्हते. मोरारजीभाई आणि आपण यांच्यात झालेल्या पत्रव्यवहाराचा त्यांनी स्वतःच उल्लेख केल्यामुळे हा पत्रव्यवहार संसदेपुढे ठेवण्याचा हट्ट इंदिरा-काँग्रेसने ताणून धरला आहे. दोन मंत्र्यांमधील पत्रव्यवहार गुप्त असल्यामुळे तो आपण प्रसिद्ध करणार नाही असे मोरारजीभाईंनी सांगितल्यानंतर संसदेचे कामकाज बंद पाडण्याचा कावा इंदिरा-काँग्रेसने रचला. शेवटी राज्यसभेचे अध्यक्ष आणि लोकसभेचे सभापती यांना, तो पत्रव्यवहार विरोधी पक्षनेत्यांना दाखवावा लागला. त्यामुळे तो आता संसदे-समोर मांडणे किंवा न मांडणे हा केवळ प्रतिष्ठेचा प्रश्न राहिलेला आहे. याबाबत मोरारजीभाईंना माघार घ्यायला लावण्याचा निर्धार इंदिरा-काँग्रेसने केलेला असून त्यानुसार पुन्हा संसदेत चकमकी झडण्याचा संभव निर्माण झालेला आहे. लोकसभेमध्ये जनता पक्षाची सदस्यसंख्या भरपूर असल्यामुळे स्टीफन किंवा वसंत साठे यांचा आरडाओरडा प्रभावी ठरू शकणार नाही; परंतु राज्यसभेतील परिस्थिती वेगळी आहे. तेथे विरोधी पक्षीय सदस्य बहुसंख्येने आहेत. त्यामुळे मोरारजीभाईंच्या कुटुंबियांसंबंधी चरणसिंगांनी केलेले आरोप आणि चरणसिंगांच्या परिवारासंबंधी मोरारजीभाईंनी आपल्या उत्तरामध्ये केलेला उल्लेख यांची शहानिशा करण्यासाठी चौकशी आयोग नेमण्यात यावा असा प्रस्ताव इंदिरा काँग्रेसकडून राज्यसभेत मांडला जाण्याची शक्यता आहे आणि स्वर्णसिंग काँग्रेसमधील जो गट इंदिरा काँग्रेसशी हातमिळवणी करा-यला उतावीळ झालेला आहे तो या प्रस्तावाला अनुमोदन दिल्या-शिवाय राहणार नाही. विरोधीपक्षीय सदस्यांच्या या डावपेचाला शह द्यायचा असेल तर मोरारजी देसाई यांनी मागणी केल्याप्रमाणे चरणसिंगांनी आपल्या पत्रातील विधाने जाहीर रीतीने मागे घ्यायला राजी होणे आवश्यक आहे. बिजू पटनाईक आणि मधू लिमये यांना लगोलग जी कामगिरी पार पाडायची आहे ती हीच. स्वहितापेक्षा पक्षहिताला प्राधान्य देण्याचा समजूतदारपणा चरणसिंग दाखवितात की पक्षाचे काहीही झाले तरी आपण त्याची फिकीर करणार नाही अशी बेपर्वाईची भूमिका घेतात यावरच केंद्रीय सत्तेची धुरा जनता पक्षापाशी किती काळ राहील याचा निर्णय होणार आहे. □

## अवती-भवती : पृष्ठ ६ वरून

गटाने भारतीय राजकारणामध्ये एक तिसरी प्रभावी शक्ती निर्माण करण्याचा आव आणला; पण इंदिरा गांधींनी त्यांचे सारे प्रयत्न हाणून पाडले. एकाही पोटनिवडणुकीमध्ये काँग्रेसच्या वाट्याला यश तर सोडाच; पण सन्माननीय पराभवही आला नाही. प्रत्येक निवड-णुकीत केविलवाणा पराभव स्वीकारावा लागल्याने पक्षाची ताकद घटत चालली आणि त्यातच इंदिरा काँग्रेसबरोबर ऐक्य करावे असा विचार घेऊन एक गट कामाला लागला. पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांचा विरोध असूनही ही प्रक्रिया थांबू शकली नाही. महाराष्ट्रामधील ताज्या सत्तांतराचे एक कारण या राज्याच्या त्या वेळच्या मुख्यमंत्र्यांनी जे धोरण स्वीकारले होते त्यामध्ये पाहावयास मिळते. महाराष्ट्रा-मध्ये जे बदल घडून आले आहेत त्यामुळे काँग्रेसपक्षाच्या अस्तित्वा-लाच धोका आला आहे. शरद पवार आणि कंपनीची हकालपट्टी ग्राह्य मानली तर आता काही प्रमाणात केरळचा अपवाद वगळता या पक्षाला सत्तेच्या राजकारणात जागा उरली नाही. तिसऱ्या शक्तीची एके काळी गोड वाटणारी कल्पना विसंगत ठरली आणि इंदिरेच्या मागे जाणे अथवा जनता पक्षाचे सहकार्य घेत आस्ते आस्ते जनता पक्षात विलीन होणे याखेरीज तिसरा पर्याय राहिला नाही, अशी आजची अवस्था आहे. इंदिरा काँग्रेसने आजचे सत्ता-धारी विरोधी पक्षात असताना जे काही करीत होते ते सारे करण्याचा चंग बांधला आहे. आपले धोरण आखताना इंदिरा काँग्रेसही जुन्या जनसंघनेत्यांबद्दल जास्त आक्रमक धोरण स्वीकारून जुन्या काँग्रेस-वाल्यांना चुचकारण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यातून काही राजकीय लाभ मिळाले तर ते उठविण्याची पुरेपूर शक्यता आहे.

काँग्रेस आणि इंदिरा काँग्रेस यांच्या खेरीज इतर विरोधी पक्षांना लोकसभेमध्ये फारसे स्थान नाही. इंदिरा राजवटीमध्ये जुने कम्यु-निस्ट जसे सरकारी पक्षाचे होते, तसे आता डावे कम्युनिस्ट सरकारी पक्षाचे आहेत. म्हणजे सरकारवर अजिबात टीका करायची नाही असे त्यांचे धोरण नाही. तथापी ते कधीही तुटेपर्यंत ताणणार नाहीत आणि महत्त्वाच्या प्रश्नावर जनता पक्षाला कधीही दगा करणार नाहीत. स्वतःचे सामर्थ्य वाढविण्याची एकही संधी ते गमवीत नाहीत. प्रादेशिक पक्षांपैकी अकाली दल आणि अण्णा डिएमके हे दोन प्रभावी प्रादेशिक पक्ष आहेत. पैकी अण्णा डिएमके दिल्लीमध्ये ज्यांची सत्ता असेल त्यांच्याकडे तोंड करून उभा राहणारा पक्ष असल्याने दिल्ली-मधील सत्ताधीश बदलताच अण्णा डिएमके नवीन सत्ताधीशांना सोयिस्कर वाटेल असे राजकारण करताना दिसत आहे. अकाली पक्षाबद्दल तर काही बोलण्यात मतलब नाही. त्यांची आणि जनता पक्षाची केवळ दोस्तीच नाही तर सत्तेमध्येही ते जनता पक्षाबरोबर वाटेकरी आहेत.

आज विरोधी पक्षांच्या बळाचे जे एकंदर दृश्य दिसत आहे ते पहाता इंदिराजी स्वतः म्हणतात त्याप्रमाणे खरोखरच इंदिरा काँग्रेस हाच एकमेव विरोधी पक्ष असल्याचे दिसते.

□

# कंपनी शेअर्समध्ये आपण लहान रक्कम गुंतविली आहे काय? मग आपण करकपात न करता, डिव्हिडंड घेऊ शकता

❊ जर आपली स्वत:ची कंपनी नसेल आणि आपली डिव्हिडंडच्या रकमेसह एकूण प्राप्ति, कर लागू करण्यासाठी असलेल्या किमान मर्यादेपेक्षा कमी असेल (व्यक्ती, अविभक्त हिंदू कुटुंबे, व्यापारी संस्था, व्यक्तींचा संघ, मंडळे, संघटना आणि कृत्रिम कायदेशीर व्यक्ती यासाठी हल्ली ही किमान मर्यादा १०,००० रुपये आहे.) तर, कंपनीतर्फे जाहीर करण्यात आलेली डिव्हिडंडची रक्कम, आपण काही करकपात न करता घेऊ शकता.

**कसे ?**

❊ ज्या कंपनीचे शेअर्स आपणांकडे आहेत, त्या कंपनीने, आपणास कर न कापता डिव्हिडंडची रक्कम द्यावी म्हणून कंपनीला परवानगी देणारे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आपण फॉर्म नं. १४ वर आपल्या प्राप्तिकरअधिकाऱ्याकडे अर्ज करा.

**अथवा**

❊ कोणत्याही कंपनीतर्फे मिळणारी डिव्हिडंडची रक्कम रु. २५० पेक्षा कमी असेल तर, अशा प्रत्येक कंपनीला आपण फॉर्म नं. १४ बी वर एक जाहीरपत्रक (दोन प्रती) पाठवा.

---

**या सवलतींचा फायदा घ्या आणि प्राप्तिकर अधिकाऱ्याकडून नंतर परतफेड मागण्याचे टाळा.**

---

निवेदक
**डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन**
(रिसर्च, स्टॅटिस्टिक्स अँड पब्लिकेशन्स)
**इन्कम टॅक्स डिपार्टमेंट**
नवी दिल्ली

davp 78/158 (Marathi)

# ?

# जनमत कौल
# एक नवा उपक्रम

महाराष्ट्रात नुकतेच झालेले सत्तान्तर ही राजकीय क्षितिजावरील एक महत्त्वपूर्ण घटना आहे. या सत्तान्तरामुळे टिळक–गांधी–नेहरू यांची काँग्रेस संपली या टोकापासून, सर्व देशभर काँग्रेस एक होऊन मागील दाराने पुन्हा सत्तेवर येण्याची प्रक्रिया सुरू झाली या टोकापर्यंत, अनेक प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. राजकीयदृष्टया जागरूक असलेला सर्वसामान्य नागरिकही या घटनेमुळे अस्वस्थ झालेला आहे, गोंधळलेला आहे. जनता पक्षाची ध्येयधोरणे, पुढील वाटचाल व एकूण भवितव्य या संदर्भातही या सत्तान्तराला विशेष अर्थ आज आलेला आहे.

या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकांची या घटनेसंबंधीची प्रतिक्रिया जाणून घ्यावी म्हणून ' माणूस 'द्वारा एक जनमतकौल घेण्याचे ठरले आहे. यासाठी एक अगदी छोटी प्रश्नपत्रिका तयार केली असून ती मागील बाजूस दिली आहे. हा कौल लवकर प्रसिद्ध होणे महत्त्वाचे असल्याने प्रश्नपत्रिका सर्वांनी शक्यतो लवकर, उशिरात उशीरा ५ ऑगस्टच्या आंत भरून पाठवावी, ही विनंती.

ही प्रश्नावली तयार करण्यात पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्रविभागाचे प्रमुख प्रा. शिरसीकर आणि त्यांचे सहकारी यांचे सहकार्य लाभलेले आहे.

प्रश्नावलीतील माहिती गोपनीय राखली जाईल. ज्यांना प्रश्नावलीव्यतिरिक्त काही मतप्रदर्शन करावयाचे असेल त्यांनी ते प्रश्नपत्रिकेसोबत स्वतंत्र कागदावर लिहून पाठवावे. हे मतप्रदर्शन मात्र ' प्रसिद्धी साठी ' आहे असे गृहीत धरले जाईल व प्रसिद्धियोग्य वाटणारे मतप्रदर्शन वा प्रतिक्रिया ' माणूस 'मधून किंवा अन्यत्र प्रसिद्ध केल्या जातील.

मतप्रदर्शन–प्रतिक्रिया शक्यतो थोडक्या शब्दात व्यक्त व्हाव्यात.

अशा कारणाकरिता घेतला जात असलेला ' जनमतकौल ' हा एक नवीन उपक्रम आहे. अधिकात अधिक संख्येने नागरिक यात सहभागी होतील व तो यशस्वी करतील अशी आशा आहे.

**–संपादक साप्ताहिक ' माणूस '**

# जनमत कौल : पाच प्रश्न

१. महाराष्ट्रात हे पहिले संमिश्र
पवार मंत्रिमंडळ येणे ही घटना मला..........................योग्य वाटते / अयोग्य वाटते.

२. नव्या मंत्रिमंडळाचा बनाव लोकशाहीला........................उपकारक आहे / मारक आहे.

३. या ( मंत्रिमंडळाच्या ) घटनेमुळे इंदिरा काँग्रेस
अधिक बळकट होईल असे आपल्याला वाटते काय ?.............होय / नाही.

४. या ( मंत्रिमंडळाच्या ) घटनेमुळे जनता पक्षाची प्रतिमा..........डागळली आहे / उजळली आहे.

५. नव्या मंत्रिमंडळाने पुढील सहा कार्यक्रमांपैकी
कोणत्या तीन कार्यक्रमांना प्राधान्य द्यावे
असे आपल्याला वाटते ?

१ : सक्तीचे कुटुंबनियोजन
२ : किमान वेतन–रुपये पाच
३ : सुशिक्षितांसाठी रोजगार हमी
४ : शेतीउत्पन्नावर कर
५ : प्रत्येक खेड्यात पिण्याच्या पाण्याची सोय
६ : प्रत्येक गावात 'एक गाव एक पाणवठा'

७ : संपूर्ण नाव व पत्ता ______________________

______________________

______________________

८ : व्यवसाय ______________ ९ : वय ______________

* उत्तरे देताना नको असलेले शब्द फक्त खोडायचे आहेत. न खोडलेला भाग उत्तर म्हणून समजण्यात येईल.

* पाचव्या प्रश्नात फक्त तीन कार्यक्रम सुचवायचे आहेत. जे कार्यक्रम प्राधान्यविचारासाठी नको असतील तेवढे खोडले जावेत.

* शक्यतो लवकर, उशिरात उशीरा ५ ऑगस्ट (१९७८)पूर्वी वरील प्रश्नपत्रिका भरून 'माणूस'कडे पाठवायच्या आहेत.

* प्रश्नपत्रिका भरून, बंद पाकिटातून 'माणूस'कडे पाठवावी. पाकिटावर 'जनमतकौल' असे वर एका कोपऱ्यात लिहावे.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०